RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष ७, अंक २८] शुक्रवार, ऑगस्ट २७, २०२१/ भाद्रपद ५, शके १९४३ [पृष्ठे ९५, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ३६

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक २७ ऑगस्ट २०२१

अधिसूचना

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२०.

क्रमांक सासुसं २०२१/प्र.क्र.२८/कामगार ०९.— सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (२०२० चा ३६) याच्या कलम १५४ व कलम १५६ तसेच सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम,१८९७(१८९७ चा १०) याच्या कलम २४ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि प्रसुती लाभ अधिनियम,१९६१ (१९६१ चा ५३) अन्वये केलेले महाराष्ट्र प्रसुती लाभ नियम, १९६५, उपदान प्रदान अधिनियम, १९७२(१९७२ चा ३९) अन्वये केलेले उपदान प्रदान (महाराष्ट्र) नियम,१९७२ व असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम,२००८ (२००८ चा ३३) अन्वये केलेले महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम,२०१३ यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासनाने, करण्याचे प्रस्तावित केलेले नियमांचे पुढील प्रारुप, त्याद्वारे बाधित होण्याचा संभव असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, कलम १५४ च्या पोट-कलम (१) व कलम १५६ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रामध्ये** ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवस समाप्त झाल्यानंतर उक्त प्रारुप, महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. वर नमूद केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी, उक्त प्रारुपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, इ ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०००५१ यांना किंवा mahalabourcommr@gmail.com या ईमेलवर प्राप्त होतील असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना, शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. मा. साठे,
शासनाचे सह सचिव.

प्रारुप नियम

प्रकरण - एक
प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव.- या नियमांस,महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम,२०२१ असे म्हणावे.

२. व्याख्या.- (१) या नियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यांनुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपिलीय प्राधिकारी" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन किंवा संहितेच्या कलम ५६ च्या पोट-कलम (८) अन्वये महाराष्ट्र शासनाने विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी, किंवा यथास्थिती, संहितेच्या कलम १०५ च्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या निर्धारण अधिका-याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जा असलेला अधिकारी, असा आहे;

(ख) "प्राधिकरण" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन किंवा निरीक्षक- तथा-सुविधाकाराच्या आदेशाविरुद्ध अपील करण्यासाठी कलम ७२ च्या पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेले प्राधिकरण, असा आहे;

(ग) "अध्यक्ष" याचा अर्थ, सामाजिक सुरक्षा मंडळाचा अध्यक्ष, किंवा यथास्थिती, कल्याण मंडळाचा अध्यक्ष, असा आहे;

(घ) "संहिता" याचा अर्थ, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (२०२० चा ३६), असा आहे;

(ड.) "इलेक्ट्रॉनिक स्वरूपात" याचा अर्थ, संहितेच्या प्रयोजनार्थ, ईमेलद्वारे सादर केलेली अथवा विनिश्चित केलेल्या पोर्टलवर टाकलेली (अपलोड केलेली) कोणतीही माहिती अथवा कोणत्याही मार्गाने केलेले डिजिटल प्रदान, असा आहे;

(च) "सदस्य" याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे;

(छ) "निधी" याचा अर्थ, सामाजिक सुरक्षा निधी, असा आहे;

(ज)"नमुना" याचा अर्थ, या नियमांस जोडलेला नमुना, असा आहे;

(झ) "नामनिर्देशन" याचा अर्थ, संहितेच्या कलम ५५ अन्वये केलेले नामनिर्देशन, असा आहे;

(ञ) "महिला कर्मचा-यांची नोंदवही" याचा अर्थ, कलम ४१ अन्वये ठेवलेली महिला कर्मचा-यांची नोंदवही, असा आहे;

(ट) "कलम" याचा अर्थ, या संहितेचे कलम, असा आहे;

(ठ) "सामाजिक सुरक्षा मंडळ" याचा अर्थ, संहितेच्या कलम ६ च्या पोट-कलम (९) अन्वये घटित केलेले महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ, असा आहे;

(ड) "विनिर्दिष्ट" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या किंवा महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याच्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेले, असा आहे;

(ढ) "वर्ष" याचा अर्थ, वित्तीय वर्ष असा असेल म्हणजे, एक एप्रिलपासून सुरु होणारे आणि पुढील वर्षाच्या एकतीस मार्च रोजी संपणारे वर्ष, असा आहे;

(ण) "कल्याण मंडळ" याचा अर्थ, संहितेच्या कलम ७ अन्वये घटित केलेले महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, असा आहे;

(२) या नियमांमध्ये वापरलेले आणि व्याख्या न केलेले, परंतु संहितेमध्ये व्याख्या केलेले शब्द व संज्ञा यांना संहितेमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

प्रकरण - दोन

महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ

३. संहितेच्या कलम ६ अन्वये महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ.—(१) कलम ६ च्या पोट-कलम (९) अन्वये घटित केलेले मंडळ हे, महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ म्हणून संबोधण्यात येईल.

(२) (क) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी पद धारण करेल.

(ख) सदस्य, पुन:नामनिर्देशित करण्यासाठी पात्र असेल, परंतु, सदस्य एकूण दोनपेक्षा अधिक पदावधींसाठी पद धारण करणार नाही.

(३) (क) राज्य शासनास, कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (ग) अन्वये भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयातील केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य घेता येईल.

(ख) राज्य शासनास, राज्य शासनाद्वारे ठरवण्यात येईल त्याप्रमाणे, कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (एक) व (दोन) अन्वये, असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या संघांच्या प्रतिनिधींमधून सात नामनिर्देशित व्यक्तींना आणि असंघटित क्षेत्राच्या नियोक्त्यांच्या संघांमधून सात नामनिर्देशित व्यक्तींना सामाजिक सुरक्षा मंडळावर घेता येईल.

(ग) राज्य शासन, कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (तीन) अन्वये, विधानसभेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन सदस्यांना नामनिर्देशित करेल .

(घ) राज्य शासन, कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (चार) अन्वये, कामगार कल्याण, व्यवस्थापन, वित्त, कायदा व प्रशासन या क्षेत्रांमधील विख्यात व्यक्तींमधून पाच सदस्यांना नामनिर्देशित करेल.

(ङ) राज्य शासन, कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (पाच) अन्वये, असंघटित कामगारांच्या कल्याणाशी संबंधित असणाऱ्या बाबींशी संबंधित असलेल्या, राज्य शासनाच्या विविध विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दहा सदस्यांना नामनिर्देशित करेल.

(४) राज्य शासन, विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांना, सामाजिक सुरक्षा मंडळाचा सदस्य-सचिव म्हणून नामनिर्देशित करेल.

(५) कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (एक) व (दोन) अन्वये नामनिर्देशित केलेला सदस्य, जर त्याने, ज्या प्रवर्गातून त्याला अशा प्रकारे नामनिर्देशित केलेले होते त्या प्रवर्गाच्या हिताचे प्रतिनिधित्व करण्याचे बंद केले असेल तर, तो, मंडळाचे सदस्यत्व संपुष्टात येईल.

परंतु, उपखंड (एक) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सात व्यक्तींपैकी प्रत्येकी एक सदस्य, अनुसूचित जातीतील, अनुसूचित जमातीतील, अल्पसंख्याकांमधील व महिलांमधील प्रतिनिधी असेल.

(६) कलम ६ च्या पोट-कलम (१०) च्या खंड (घ) च्या उपखंड (तीन) अन्वये नामनिर्देशित केलेला सदस्य, जर तो, ज्यातून तो अशा प्रकारे निवडून आलेला होता त्या विधानसभेचा सदस्य असण्याचे बंद झाला असेल तर, मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) कोणतीही व्यक्ती, जर अशी व्यक्ती, कलम ८ खालील अपात्रतांपैकी कोणत्याही अपात्रतेमुळे अपात्र ठरेल तर, तिला मंडळाचा सदस्य म्हणून निवडण्यात येणार नाही किंवा ती, सदस्य असण्याचे चालू राहणार नाही.

४. सामाजिक सुरक्षा मंडळाच्या अधिकारांचा वापर करण्याची व कामे करण्याची रीत. — (१) मंडळ, कलम ६ च्या पोट-कलम (१५) अन्वये त्याच्याकडे सोपविलेली त्याची कामे पार पाडण्यासाठी, अशा समितीकडे सोपविण्यात येतील अशा विशिष्ट प्रश्नांवर विचारविमर्श करण्यासाठी व शिफारस करण्यासाठी एक समिती गठित करू शकेल.

(२) अशी समितीस, यथास्थिती,मंडळातून किंवा बाहेरून किंवा ज्या क्षेत्रावर समितीला विचारविमर्श करणे आवश्यक असेल त्या क्षेत्रातील तज्ज्ञांमधून सदस्य स्वीकृत करता येतील.

५. सामाजिक सुरक्षा मंडळाचे पुनर्घटन.—(१) राज्य शासन, मंडळाची मुदत समाप्त होण्याच्या सहा महिने आधी, सामाजिक सुरक्षा मंडळ पुनर्घटित करण्यासाठी रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करेल.

(२) जर मंडळाची मुदत संपल्यानंतर, नवीन सामाजिक सुरक्षा मंडळ पुनर्घटित केलेले नसेल तर,सामाजिक सुरक्षा मंडळाची कामे पार पाडण्यासाठी, नवीन मंडळ घटित केले जाईपर्यंतच्या कालावधीकरिता राज्य शासनाद्वारे ठरवण्यात येईल अशी व्यवस्था करता येईल.

(३) अशी व्यवस्था सुरू केल्याच्या परिणामी, हाती घेतलेल्या सर्व कारवाया हया, जणूकाही त्या स्वतः सामाजिक सुरक्षा मंडळाकडून करण्यात आलेल्या कारवाया आहेत असे समजून त्याचा तोच परिणाम असेल.

६. सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्यांचा राजीनामा.—(१) पदसिद्ध सदस्य नसणाऱ्या सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्यास, राज्य शासनास उद्देशून लेखी पत्राद्वारे राजीनामा देता येईल.

(२) अशा सदस्याची जागा, ज्या तारखेस त्याचा राजीनामा स्वीकृत केला आहे त्या तारखेपासून किंवा राजीनाम्याची सूचना मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवस समाप्त झाल्यावर, यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून, रिक्त होईल.

(३) सदस्याचा राजीनामा स्वीकारण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे निहित असेल.

७. पत्त्यातील बदल.—जर एखाद्या सदस्याने त्याच्या पत्त्यात बदल केला असेल तर, तो, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्य-सचिवास त्याचा नवीन पत्ता लेखी स्वरूपात कळवील, सदस्य-सचिव, त्यानंतर कार्यालयीन अभिलेखामध्ये त्याचा नवीन पत्ता नोंदवील :

परंतु, जर एखादा सदस्य, त्याचा नवीन पत्ता कळवण्यास कसूर करेल तर, कार्यालयीन अभिलेखातील त्याचा पत्ता हा, सर्व प्रयोजनांसाठी सदस्याचा अचूक पत्ता असल्याचे मानण्यात येईल.

८. रिक्त पदे भरण्याची रीत.—जेव्हा सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्याचे पद रिक्त होते तेव्हा किंवा रिक्त होण्याचा संभव असेल तेव्हा, सामाजिक सुरक्षा मंडळाचा सदस्य-सचिव, राज्य शासनाला अहवाल सादर करेल आणि असा अहवाल मिळाल्यावर, राज्य शासनास, वरील नियम ३ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, रिक्त पद भरण्यासाठी एखाद्या व्यक्तीस, अधिसूचनेद्वारे, नामनिर्देशित करता येईल, आणि अशा प्रकारे नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ज्याच्या जागी तिला अशा प्रकारे नामनिर्देशित केलेले आहे त्या सदस्याच्या उर्वरित पदावधीसाठी पद धारण करेल.

९. सामाजिक सुरक्षा मंडळातून सदस्यला काढण्याची कार्यपद्धती.—(१) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्यास काढण्यासाठी कलम ८ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) व (ग) खालील कार्यवाही, कोणतीही असल्यास, प्रलंबित असताना, अशा सदस्यास, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या बैठकीतून दूर ठेवण्यात येईल.

(२) कलम ८ अन्वये कोणत्याही सदस्याचे प्रतिरोधन, अपात्रता व त्यास काढून टाकणे यांवरील राज्य शासनाचा निर्णय, अंतिम असेल.

१०. सामाजिक सुरक्षा मंडळाचे व त्याच्या समित्यांचे कामकाज चालवण्याची कार्यपद्धती.—(१) बैठका. - (क) सामाजिक सुरक्षा मंडळ किंवा त्याची कोणतीही समिती, पोट-नियम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, अध्यक्षाद्वारे ठरवण्यात येईल अशा ठिकाणी व वेळी बैठक बोलावतील.

(ख) सामाजिक सुरक्षा मंडळाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष, जेव्हा जेव्हा त्यास योग्य वाटेल तेव्हा, बैठक बोलावू शकेल आणि त्याची विशेष बैठक बोलवण्यासाठी संबंधित सभेच्या सदस्यांपैकी निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांकडून लेखी मागणी प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, बैठक बोलावील. अशा प्रकारे केलेल्या मागणीत, बोलविण्याचे प्रस्तावित असलेल्या बैठकीचा उद्देश विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(२) बैठकीची नोटीस व तिचे कामकाज.—(क) अध्यक्षाने मान्यता दिलेली, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या प्रत्येक सर्वसाधारण बैठकीची तारीख, वेळ व ठिकाण अंतर्भूत असणारी नोटीस, ती काढल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल अशी नोटीस, बैठकीत करावयाच्या कामकाजाच्या यादीसह, ईमेलद्वारे किंवा नोंदणीकृत डाकेने, किंवा यथास्थिती, विशेष संदेश वाहकाद्वारे सामाजिक सुरक्षा मंडळाच्या, किंवा यथास्थिती, त्याच्या कोणत्याही समितीच्या प्रत्येक सदस्यास पाठवण्यात येईल. कार्यसूचीच्या प्रत्येक बाबीवरील संक्षिप्त टिपणी, त्यानंतर शक्य तितक्या लवकर, कार्यसूचीसह पाठवण्यात येईल.

(ख) अध्यक्ष, त्याच्या मते जी तातडीची आहे अशा कोणत्याही बाबीवर विचार करण्यासाठी सामाजिक सुरक्षा मंडळाची किंवा त्याच्या कोणत्याही समितीची तातडीची बैठक बोलावील तेव्हा अशा प्रकरणी, त्यास आवश्यक वाटेल अशा वाजवी वेळेची नोटीस,पुरेशी असल्याचे मानण्यात येईल.

(ग) ज्या कामकाजासाठी सामाजिक सुरक्षा मंडळाची किंवा त्याच्या कोणत्याही समितीची बैठक बोलविण्यात आलेली असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही कामकाज, बैठकीच्या अध्यक्षाच्या परवानगीखेरीज बैठकीत विचारात घेण्यात येणार नाही.

(३) बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेला अध्यक्ष. - अध्यक्ष, किंवा यथास्थिती, त्याच्या अनुपस्थितीत सामाजिक सुरक्षा मंडळाचा उपाध्यक्ष, बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हे दोघेही अनुपस्थित असल्यास, अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित करण्यात येईल असा सदस्य, बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(४) गणपूर्ती - (क) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या दहा सदस्यांच्या गणसंख्ये इतकी उपस्थिती असल्याशिवाय, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या कोणत्याही बैठकीत कोणतेही कामकाज करण्यात येणार नाही.

(ख) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या कोणत्याही समितीची बैठक घेण्यासाठी, समितीच्या सदस्य संख्येच्या एक-तृतीयांश सदस्यांनी मिळून गणपूर्ती होईल.

परंतु, गणपूर्ती होण्यासाठी, कोणत्याही बैठकीत पर्याप्त संख्येतील सदस्य उपस्थित नसतील तर, बैठकीचा अध्यक्ष, बैठक, एक तासासाठी तहकूब करू शकेल आणि त्यानंतर, उपस्थित सदस्यांची संख्या विचारात न घेता, अशा तहकूब केलेल्या बैठकीत कामकाज करणे कायदेशीर असेल.

(५) एखाद्या सदस्याच्या अनुपस्थितीमध्ये बदली व्यक्तीचे नामनिर्देशन.- (क) जर एखादा सदस्य, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर, तो, त्याच्या सहीने, संबंधित सभेच्या अध्यक्षास उद्देशून लिहिलेल्या व बैठकीस उपस्थित राहण्याच्या त्याच्या असमर्थतेची कारणे स्पष्ट करणाऱ्या लेखी सूचनेद्वारे, सामाजिक सुरक्षा मंडळावर किंवा तिच्या कोणत्याही समितीवर, तो जिचे प्रतिनिधित्व करत आहे त्या संघटनेच्या कोणत्याही प्रतिनिधीची, त्याच्या जागी त्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी त्याचा बदली व्यक्ती म्हणून नियुक्ती करू शकेल:

परंतु,जर, —

(एक) अशी नियुक्ती, संबंधित सभेच्या अध्यक्षाकडून मान्य करण्यात आलेली नसेल तर; आणि

(दोन) अशी नियुक्ती करणारी सूचना, बैठकीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी संबंधित सभेच्या अध्यक्षास प्राप्त झालेली नसेल तर,

अशी कोणतीही नियुक्ती वैध असणार नाही.

(ख) खंड (क) अन्वये नियुक्त केलेल्या बदली नामनिर्देशित व्यक्तीस, ज्या बैठकीच्या बाबतीत तिची नियुक्ती केलेली आहे त्या संबंधित सभेच्या बैठकीच्या संबंधात, सदस्याचे सर्व हक्क व अधिकार असतील आणि जणूकाही ती संहिते अन्वये नियुक्त केलेली सदस्य होती असे समजून आबंधनांखाली असेल.

(ग) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही बैठकीत उपस्थित राहण्यासाठी बदली व्यक्ती म्हणून नियुक्ती करणारा सदस्य, या पोट-नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बदली व्यक्तीने केलेल्या निधीच्या अपहारासाठी किंवा गैरविनियोगासाठी नियमितपणे जबाबदार असेल आणि त्याने नियुक्त केलेल्या बदली व्यक्तीने, निधीच्या संबंधात केलेल्या अपकार्याच्या किंवा अकार्याच्या कोणत्याही कृत्यासाठी देखील जबाबदार असेल.

(६) कामकाज उरकणे.—सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकीत विचार केलेल्या प्रत्येक प्रश्नावर, संबंधित सभेच्या उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल. समसमान मते पडल्यास अशा प्रसंगी, अध्यक्षास, अतिरिक्त निर्णायक मत असेल :

परंतु, अध्यक्षास, जर त्याला योग्य वाटले तर, असा निदेश देता येईल की, कोणत्याही प्रश्नावर, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या सदस्यांकडे, आवश्यक कागदपत्रे, प्रसृत करून आणि त्यांची लेखी मते मिळवून निर्णय घेण्यात येईल. अशा कोणत्याही प्रश्नावर, मुभा दिलेल्या कालमर्यादेत प्राप्त झालेल्या सदस्यांच्या बहुमतानुसार निर्णय घेण्यात येईल आणि जर मते समसमान विभागली गेली तर, अध्यक्षाचे मत अधिभावी असेल :

परंतु आणखी असे की, सामाजिक सुरक्षा मंडळाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा कोणताही सदस्य अशी विनंती करू शकेल की, लेखी मतासाठी संबंधित सभेच्या सदस्यांना पाठवलेल्या प्रश्नावर, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा यथास्थिती, त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकीत विचार करण्यात यावा आणि त्यानंतर अध्यक्षास, आणि जर संबंधित सभेच्या तीनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांकडून विनंती केलेली असेल तर, त्यावर अशाप्रकारे विचार करण्यात यावा असा निदेश देता येईल.

(७) बैठकींची इतिवृत्ते.—(क) इतर गोष्टींबरोबरच बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे दर्शविलेले प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त, शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही बाबतीत बैठकीनंतर चार आठवड्यांपेक्षा उशिराच्या नसेल इतक्या कालावधीत, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या, किंवा यथास्थिती, त्याच्या कोणत्याही समितीच्या प्रत्येक सदस्यास आणि राज्य शासनास पाठवण्यात येईल.

(ख) बैठकीचे इतिवृत्त, आवश्यक वाटतील अशा फेरबदलांसह पुढच्या बैठकीमध्ये कायम करण्यात येईल.

(ग) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकीची इतिवृत्ते, स्वतंत्र पुस्तकांमध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश, "इतिवृत्त पुस्तके" असा केला आहे) ठेवण्यात येतील आणि ज्या बैठकीत कार्यवाही कायम केलेली आहे त्या बैठकीच्या अध्यक्षाकडून त्यावर सही करण्यात येईल.

(घ) अशा प्रकारे कायम केलेल्या इतिवृत्ताची प्रत, असे कायम केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, राज्य शासनास पाठविण्यात येईल.

(ङ) इतिवृत्त पुस्तके, संबंधित सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यांकडून त्यांची निशुल्कपणे तपासणी करण्यासाठी कामकाजाच्या दैनिक वेळेमध्ये सामाजिक सुरक्षा मंडळाच्या मुख्य कार्यालयात खुली ठेवण्यात येतील.

११. सामाजिक सुरक्षा मंडळाच्या व तिच्या समित्यांच्या सदस्यांना द्यावयाचे शुल्क व भत्ते.—(१) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या, किंवा यथास्थिती, त्याच्या समितीच्या प्रत्येक सदस्यास, त्याच्या बैठकीच्या उपस्थिती करिता, त्यांच्या संबंधित ठिकाणी, राज्य शासनाच्या गट-अ अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या कमाल दराने परिगणना करण्यात येईल असा, प्रवास व दैनिक भत्ता मिळण्याची मुभा असेल.

(२) जेव्हा असा सदस्य, विधान मंडळाचा सदस्य असेल जेव्हा, त्याला, महाराष्ट्र विधान मंडळ सदस्यांशी संबंधित असणाऱ्या कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता प्रदान करण्यात येईल:

परंतु, जेव्हा सामाजिक सुरक्षा मंडळाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष म्हणून एखाद्या मंत्र्याची नियुक्ती केली जाते तेव्हा आणि तो बैठकीस उपस्थित असतो तेव्हा, त्याचा प्रवास व दैनिक भत्ता, शासकीय कर्तव्यावर असताना केलेल्या प्रवासासाठी त्याला लागू असलेल्या नियमाद्वारे विनियमित करण्यात येईल आणि त्याचे वेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे प्रदान करण्यात येईल.

(३) जर सदस्याला, त्याच्या नियोक्त्याकडून अथवा समितीचा किंवा कोणत्याही विधानमंडळाचा किंवा राज्य शासनाने घटित केलेल्या किंवा निमंत्रित केलेल्या कोणत्याही समितीचा किंवा परिषदेचा सदस्य म्हणून त्यासाठी भत्ता काढलेला असेल किंवा काढण्यात येणार असेल तर, सामाजिक सुरक्षा मंडळाच्या सदस्याकडून किंवा त्याच्या कोणत्याही समितीकडून, प्रवासाच्या कोणत्याही दिवसाच्या बाबतीत, कोणत्याही दैनिक किंवा प्रवास भत्त्याची हक्क मागणी करण्यात येणार नाही आणि जर तो, राज्य शासनाच्या किंवा त्याच्या नियोक्त्याच्या खर्चाने पुरविलेल्या वाहतूक साधनाचा वापर करीत असेल तर, त्याला कोणत्याही प्रवास भत्त्याची हक्क मागणी करता येणार नाही.

(४) सामाजिक सुरक्षा मंडळाने किंवा त्याच्या कोणत्याही समितीने स्थापन केलेल्या कोणत्याही उपसमितीच्या बैठकांच्या बाबतीत देखील दैनिक व प्रवास भत्ता, प्रदेय असेल.

(५) सामाजिक सुरक्षा मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकीस किंवा सामाजिक सुरक्षा मंडळाने किंवा त्याच्या कोणत्याही समितीने स्थापन केलेल्या एखाद्या उपसमितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी, राज्य किंवा केंद्र सरकारचा सदस्य, राज्य किंवा केंद्र सरकारच्या नियमांन्वये त्याला अनुज्ञेय असलेल्या प्रमाणात त्याच्या विभागाकडून त्याचा प्रवास भत्ता घेईल आणि अशाप्रकारे काढलेल्या रकमांची, राज्य शासनाकडून त्याची मागणी करण्यात आल्यावर, सामाजिक सुरक्षा मंडळाकडून किंवा राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात येईल.

(६) एखाद्या अशासकीय सदस्यास, ज्या तारखेपर्यंत भत्त्याची हक्कमागणी केली आहे त्या अखेरच्या तारखेपेक्षा आधी प्रदान करण्यात येणार नाही. जाण्याच्या व परतीच्या अशा दोन्ही प्रवासाच्या प्रवास भत्त्याचा, प्रवास भत्ता देयकामध्ये समावेश करण्यात येईल आणि त्यासाठी केलेले प्रदान, प्रवास पूर्ण केल्याची तारीख विचारात न घेता, अंतिम असल्याचे समजण्यात येईल.

१२. कलम १५६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (१) अन्वये सामाजिक सुरक्षा मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.—(क) सामाजिक सुरक्षा मंडळाचे अधिकारी व कर्मचारी, कमाल तीन वर्षांच्या कालावधीसाठी राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घेण्यात येतील.

(ख) जेव्हा सामाजिक सुरक्षा मंडळाचे अधिकारी व कर्मचारी, राज्य शासनाच्या सेवेमधून घेतले जात नसतील तेव्हा अशा बाबतीत, सामाजिक सुरक्षा मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, ते निर्धारित करेल अशा सेवेच्या अटी व शर्तींच्या अधीनतेने, त्यांची नियुक्ती करेल.

(ग) सामाजिक सुरक्षा मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते, समकक्ष दर्जाच्या राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असेल त्यापेक्षा उच्च असणार नाहीत.

प्रकरण - तीन

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ

१३. कलम ७ खालील कल्याण मंडळाच्या अध्यक्षाची व सदस्यांची नियुक्तीची मुदत.- मंत्री (कामगार) हे, मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. कलम ७ अन्वये घटित केलेल्या कल्याण मंडळाच्या सदस्यांचा पदावधी, ज्या तारखेस त्यांची नियुक्ती राजपत्रामध्ये अधिसूचित केलेली असेल त्या तारखेस सुरू होणाऱ्या तीन वर्षांसाठी असेल.

१४.कलम ७ च्या पोटकलम (४) खालील कल्याण मंडळाच्या सदस्यांच्या नियुक्तीच्या शर्ती.— (१) जी व्यक्ती, —

(क) कल्याण मंडळाचा वेतनी अधिकारी आहे; किंवा

(ख) नादार झालेली आहे किंवा कोणत्याही वेळी नादार झाली असल्याचे तिला अधिनिर्णीत केले आहे; किंवा

(ग) वेडी असल्याचे किंवा अविकल मनाची असल्याचे आढळून आले आहे; किंवा

(घ) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोषी आहे किंवा सिद्धदोषी झाली आहे,

अशा कोणत्याही व्यक्तीची, मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही किंवा ती सदस्य म्हणून नियमित राहणार नाही.

(२) राज्य शासनास, जी व्यक्ती, पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या अपात्रतांपैकी कोणत्याही अपात्रतेस अधीन आहे किंवा अधीन ठरली आहे अथवा मंडळाच्या परवानगीशिवाय मंडळाच्या सलग तीनपेक्षा अधिक बैठकांना अनुपस्थित आहे अशा व्यक्तीस सदस्य पदावरून काढता येईल.

(३) सदस्य, राज्य शासनाची मर्जी असेपर्यंत, पद धारण करेल.

(४) जर राज्य शासनाच्या मते,—

(क) नियोक्त्याचे किंवा बांधकाम कामगारांचे प्रतिनिधित्व करणारा सदस्य, नियोक्त्याचे, किंवा यथास्थिती, बांधकाम कामगारांचे प्रतिनिधित्व करण्याचे समाप्त झाले असेल तर; किंवा

(ख) परिस्थितीची निकड किंवा राज्य शासनातील सेवा विचारात घेता, सदस्य नियमितपणे राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करू शकत नसेल तर,

राज्य शासनास, अशा सदस्याला मंडळामधून काढता येईल.

१५. अध्यक्षाद्वारे किंवा सदस्याद्वारे पदाचा राजीनामा.- कल्याण मंडळाच्या अध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्याला, कोणत्याही वेळी, राज्य शासनास उद्देशून त्याच्या सहीनिशी त्याच्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल, आणि राजीनामा स्वीकारल्यावर, त्याचे पद रिक्त होईल.

१६. रिक्त पद भरणे.- मृत्यू, राजीनामा, अपात्रता किंवा काढून टाकणे किंवा अन्य कारणामुळे कोणतेही पद रिक्त होईल अशा प्रसंगी, कल्याण मंडळ, पद रिक्त झाल्याबाबत तात्काळ राज्य शासनास कळवील आणि पद रिक्त झाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत, रिक्त पद भरण्यात येईल आणि अशा प्रकारे नियुक्त केलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिला नामनिर्देशित केलेले आहे त्या सदस्याने, पद रिक्त झाले नसते तर जितका काळ पद धारण केले असते तितक्या काळापर्यंत पद धारण करेल.

१७. सदस्यांना प्रदेय असलेले भत्ते.- राज्य शासनाच्या प्रतिनिधींव्यतिरिक्त मंडळाच्या बैठकांना उपस्थित असणारा अध्यक्ष व सदस्य यांना, कल्याण मंडळाद्वारे वेळोवेळी निश्चित करण्यात येतील अशा दराने प्रवास भत्ता व बैठक भत्ता प्रदान करण्यात येईल.

१८.कलम ७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ग) अन्वये मंडळाच्या सचिवाच्या, अन्य अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.- मंडळाचा सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वेतन व भत्ते, पुढील बाबींस अधीन राहून, वेळोवेळी मंडळाकडून निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :—

(क) (एक) कल्याण मंडळाचा सचिव, शक्य असेल तेथवर, "गट अ" अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, राज्य शासनाचा, अधिमान्यतेने कामगार विभागाचा, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी असेल.

(दोन) सचिव म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीची मुदत, तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

(ख) कल्याण मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी देखील कमाल तीन वर्षांच्या कालावधीसाठी राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घेता येतील.

(ग) जेव्हा कल्याण मंडळाचा सचिव, अधिकारी व कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेतून घेतले जात नसतील तेव्हा अशा बाबतीत, कल्याण मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, ते निर्धारित करेल अशा सेवेच्या अटी व शर्तींच्या अधीनतेने, त्यांची नियुक्ती करेल.

(घ) संहितेच्या कलम १०८ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींस अधीन राहून, मंडळाचा सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते, समकक्ष दर्जाच्या राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असेल त्यापेक्षा उच्च असणार नाही.

१९. कलम ७ च्या पोट-कलम (६) खालील कल्याण मंडळाची कामे.- कल्याण मंडळ, बांधकाम कामगारांसाठी कलम ७ च्या पोट-कलम (६) च्या खंड (ग), (घ), (ङ) व (ज) यांच्या प्रयोजनार्थ पुढील कामे करेल :—

(एक) लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेच्या हप्त्याशी संबंधित रकमेचे प्रदान करणे;

(दोन) लाभार्थ्यांच्या बालकांच्या लाभासाठी शैक्षणिक योजना तयार करणे;

(तीन) लाभार्थ्यांच्या व त्यांच्या अवलंबितांच्या मोठ्या आजारांचा उपचाराचा वैद्यकीय खर्च भागवणे.

प्रकरण - चार

उपदान

२०. कलम ५३ च्या पोट-कलम (१) च्या तिसऱ्या परंतुकाअन्वये अज्ञान व्यक्तीच्या लाभासाठी उपदानाची गुंतवणूक. —जी अज्ञान आहे अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या किंवा वारसाच्या बाबतीत, सक्षम प्राधिकारी, अशा अज्ञात व्यक्तीच्या लाभासाठी त्याच्याकडे जमा केलेली उपदानाची रक्कम, भारतीय स्टेट बँकेमध्ये किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुदत ठेवीमध्ये गुंतवील.

स्पष्टीकरण.—"राष्ट्रीयकृत बँक" याचा अर्थ, बँकिंग कंपनी (हमीचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्सम नवीन बँक किंवा बँकिंग कंपनी (हमीचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० (१९८० चा ४०) याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्सम नवीन बँक, असा आहे.

२१. कलम ५५ अन्वये कर्मचाऱ्याने नामनिर्देशन करण्याचा अर्ज.- (१) कलम ५५ च्या पोट-कलम (१) खालील नामनिर्देशन, **नमुना-एक**मध्ये करण्यात येईल आणि कर्मचाऱ्याकडून,—

(एक) जो कर्मचारी, या नियमांच्या प्रारंभाच्या तारखेस एक वर्षासाठी किंवा अधिक वर्षांसाठी आधीच नोकरीवर आहे परंतु ज्याने नामनिर्देशन सादर केलेले नाही अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, सर्वसाधारणपणे, अशा तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत; आणि

(दोन) ज्या कर्मचाऱ्याची, या नियमाच्या प्रारंभाच्या तारखेनंतर एक वर्ष सेवा पूर्ण झालेली आहे अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, सर्वसाधारणपणे सेवेचे एक वर्ष पूर्ण झाल्याच्या तीस दिवसांच्या आत,

एकतर, योग्य पोच घेतल्यानंतर, वैयक्तिक सेवेने, किंवा नोंदणीकृत पोच देय डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, नियोक्त्यास दोन प्रतींमध्ये सादर करण्यात येईल:

परंतु, जरी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर नामनिर्देशन दाखल केलेले असले तरी, नियोक्त्याद्वारे नामनिर्देशन स्वीकारण्यात येईल आणि अशा प्रकारे स्वीकारलेले नामनिर्देशन, ते विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर दाखल केलेले होते केवळ या कारणावरून अवैध ठरणार नाही.

(२) पोट-नियम (१) खालील नामनिर्देशन स्वीकारल्यापासून तीस दिवसांच्या आत, नियोक्ता, नामनिर्देशनाच्या नमुन्यात नमूद केल्याप्रमाणे कर्मचाऱ्याचा सेवाविषयक तपशील मिळवील, आस्थापनेच्या अभिलेखाच्या संदर्भावरून त्याची पडताळणी करेल आणि एकतर, नियोक्त्याद्वारे किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याद्वारे यथोचितपणे साक्षांकित केलेली नामनिर्देशनाची दुसरी प्रत, तिची पोच मिळवल्यानंतर, नियोक्त्याने नामनिर्देशन नोंदवल्याचे प्रतीक म्हणून, कर्मचाऱ्यास परत करेल आणि नामनिर्देशनाची अन्य प्रत, अभिलिखित करण्यात येईल.

(३) नामनिर्देशन करतेवेळी ज्या कर्मचाऱ्यास कुटुंब नसेल असा कर्मचारी, कुटुंब संपादन केल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, **नमुना - एकमध्ये** दोन प्रतींमध्ये, कलम ५५ च्या पोट-कलम (४) अन्वये नियोक्त्यास नव्याने नामनिर्देशन सादर करेल आणि त्यानंतर पोट-नियम (२) च्या तरतुदी, जणू काही ते, पोट-नियम (१) अन्वये केले होते असे समजून योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(४) जेव्हा नामनिर्देशित व्यक्ती कर्मचाऱ्याच्या पूर्वी मृत झालेली असेल तेव्हा अशा प्रकरणांसह नामनिर्देशनात फेरबदल करण्याची नोटीस, **नमुना - एकमध्ये,** दोन प्रतीत, पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने नियोक्त्यास सादर करण्यात येईल आणि त्यानंतर पोट-नियम (२) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(५) नामनिर्देशनावर किंवा नवीन नामनिर्देशनावर अथवा नामनिर्देशनाच्या फेरबदलाच्या नोटीसीवर कर्मचाऱ्याकडून स्वाक्षरी करण्यात येईल किंवा जर तो निरक्षर असेल तर, त्याचा अंगठ्याचा ठसा उमटवील आणि कर्मचाऱ्याद्वारे ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने सादर करण्यात येईल.

(६) नामनिर्देशन किंवा नवीन नामनिर्देशन अथवा नामनिर्देशनाच्या फेरबदलाची नोटीस, नियोक्त्याकडून त्याची पोच मिळाल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

२२. कलम ५६ अन्वये उपदानाचे प्रदान करण्यासाठी अर्ज.— (१) जो कर्मचारी, कलम ५६ च्या पोट-कलम (१) अन्वये उपदानाचे प्रदान करण्यासाठी पात्र आहे तो कर्मचारी किंवा त्याच्या वतीने कृती करण्यासाठी लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, सर्वसाधारणपणे, उपदान प्रदेय झाले असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, **नमुना- दोनमध्ये** नियोक्त्याकडे अर्ज करेल :

परंतु, जेव्हा कर्मचाऱ्याची नियतवयोमानाची किंवा सेवानिवृत्तीची तारीख माहित असेल तेव्हा, कर्मचाऱ्यास, नियतवयोमानाच्या किंवा सेवानिवृत्तीच्या तारखेच्या तीस दिवस आधी नियोक्त्याकडे अर्ज करता येईल:

परंतु आणखी असे की, निश्चित मुदतीच्या रोजगारावर असलेला कर्मचारी, जर त्याने एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्त्वावर सेवा केलेली असेल तर, तो उपदानासाठी पात्र असेल, आणि प्रत्येक पूर्ण वर्षाच्या सेवेसाठी किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक असलेल्या त्याच्या भागासाठी त्याच्या काढलेल्या शेवटच्या वेतन दराच्या आधारे, त्याला पंधरा दिवसांच्या वेतनाच्या दराने उपदान प्रदान करण्यात येईल.

(२) कलम ५३ च्या पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुकाअन्वये उपदानाचे प्रदान करण्यासाठी जो पात्र आहे अशा कर्मचाऱ्याची नामनिर्देशित व्यक्ती, सर्वसाधारणपणे, तिला उपदान प्रदेय झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, **नमुना-दोन**मध्ये नियोक्त्याकडे अर्ज करेल:

परंतु, संबंधित तपशील असलेल्या कोऱ्या कागदावरील अर्ज देखील स्वीकारण्यात येईल. नियोक्ता, त्याला आवश्यक वाटेल असा अन्य तपशील मागवू शकेल.

(३) कलम ५३ च्या पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुकाअन्वये उपदानाचे प्रदान करण्यासाठी जो पात्र आहे अशा कर्मचाऱ्याचा कायदेशीर वारस, सर्वसाधारणपणे, त्याला उपदान प्रदेय झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, **नमुना-दोन**मध्ये नियोक्त्याकडे अर्ज करेल.

(४) जेव्हा या नियमाच्या प्रारंभापूर्वी संहितेअन्वये उपदान प्रदेय झालेले असेल तेव्हा, पोट-नियम (१), (२) व (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीचा कालावधी, अशा प्रारंभाच्या तारखेपासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(५) या नियमामध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर उपदानाचे प्रदान करण्यासाठी दाखल केलेला अर्ज, जर अर्जदाराने त्याची हक्क मागणी करण्यामध्ये विलंब झाल्याची पुरेशी कारणे नमूद केलेली असतील तर, नियोक्त्याकडून देखील दाखल करून घेण्यात येईल आणि हक्क मागणीकार, विनिर्दिष्ट कालावधीमध्ये त्याचा अर्ज सादर करण्यास असमर्थ ठरलेला आहे केवळ या कारणावरून या संहितेखालील उपदानाची हक्क मागणी अविधिग्राह्य ठरणार नाही. यासंबंधातील कोणताही विवाद, त्याच्या निर्णयाकरिता, सक्षम प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करण्यात येईल.

(६) या नियमाखालील अर्ज, एकतर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा वैयक्तिक सेवेने किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने, नियोक्त्याला सादर करण्यात येईल.

२३. उपदानाच्या प्रदानाची नोटीस.- (१) उपदानाचे प्रदान करण्यासाठी नियम २१ खालील अर्ज प्राप्त झाल्याच्या दिवसापासून पंधरा दिवसाच्या आत, नियोक्ता,—

(क) जर पडताळणी केल्यावर, हक्क मागणी अनुज्ञेय असल्याचे आढळून आले तर, प्रदेय असलेल्या उपदानाची रक्कम विनिर्दिष्ट करणारी आणि त्याचे प्रदान करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेनंतर तीस दिवसांपेक्षा उशिराची नसेल अशी तारीख निश्चित करणारी, **नमुना-तीन** मधील नोटीस, अर्जदार कर्मचाऱ्याला, नामनिर्देशित व्यक्तीला, किंवा यथास्थिती, कायदेशीर वारसाला देईल, किंवा

(ख) जर उपदानाची हक्कमागणी अनुज्ञेय नसल्याचे आढळून आले तर, उपदानाची हक्कमागणी का विचारात घेणे अनुज्ञेय नाही याची कारणे विनिर्दिष्ट करणारी **नमुना- तीन** मधील नोटीस, अर्जदार कर्मचाऱ्याला, नामनिर्देशित व्यक्तीला, किंवा यथास्थिती, कायदेशीर वारसाला देईल. उपदान नाकारले असेल त्याबाबतीत, नोटीसीची प्रत, सक्षम प्राधिकरणास पृष्ठांकित करण्यात येईल.

(२) जर देय असलेल्या उपदानाचे प्रदान नियोक्त्याच्या कार्यालयामध्ये करण्यात यावायाचे असेल त्याबाबतीत, जर विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस व्यक्तीश: उपस्थित राहणे त्याला का शक्य नाही हे स्पष्ट करुन आदात्याने याबाबतीत लेखी अर्ज केला असेल तर, पोट-नियम (१) च्या खंड (क) अन्वये नोटीसीमध्ये त्या प्रयोजनासाठी निश्चित केलेली तारीख, नियोक्त्याकडून पुन्हा निश्चित करण्यात येईल.

(३) जर उपदानाचा हक्क मागणीदार, नामनिर्देशित व्यक्ती किंवा कायदेशीर वारस असेल तर, नियोक्ता, त्याची ओळख किंवा त्याच्या हक्क मागणीची दाखलयोग्यता सिद्ध करण्यासाठी संबंधित असेल असा साक्षीदार किंवा पुरावा सादर करण्याची विचारणा करू शकेल. त्याबाबतीत, पोट-नियम (१) खालील नोटीस काढण्यासाठी विनिर्दिष्ट केलेली कालमर्यादा, नियोक्त्याने मागणी केलेला असा साक्षीदार किंवा पुरावा नियोक्त्यास सादर केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

(४) एकतर पोच घेतल्यानंतर, वैयक्तिक सेवेने किंवा नोंदणीकृत पोच देय डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपामध्ये अर्जदारास नोटीस बजावण्यात येईल.

(५) उपदान प्रदेय झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर, नियोक्ता, मग अर्ज करण्यात आलेला असो किंवा नसो, उपदानाची रक्कम निर्धारित करेल आणि कलम ५६ च्या पोट-कलम (२) अन्वये, **नमुना- तीन**मध्ये लेखी नोटीस देईल.

२४. उपदान प्रदान करण्याची पद्धती.- संहितेअन्वये प्रदेय असलेले उपदान, डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा पात्र कर्मचाऱ्याच्या, नामनिर्देशित व्यक्तीच्या, किंवा यथास्थिती, कायदेशीर वारसाच्या बँक खात्यामध्ये जमा करून, प्रदान करण्यात येईल:

परंतु, प्रदानाच्या तपशीलाबाबतची सूचना, नियोक्त्याकडून, क्षेत्राच्या सक्षम प्राधिकाऱ्यास देखील इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देण्यात येईल.

२५. कलम ५६ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ख) अन्वये निदेश देण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज.- (१) जर नियोक्त्याने,—

(क) नियम २० खालील नामनिर्देशन स्वीकारण्यास किंवा नियम २१ अन्वये दाखल करावयाची मागणी करणारा अर्ज दाखल करून घेण्यास नकार दिला असेल तर ; किंवा

(ख) एकतर अर्जदाराने जी विचारात घेतलेली आहे ती उपदानची रक्कम, जी प्रदेय आहे त्यापेक्षा कमी विनिर्दिष्ट करणारी किंवा उपदानाचे प्रदान करण्याची पात्रता रद्द करणारी नियम २२ च्या पोट- नियम (१) खालील नोटीस दिली असेल तर ; किंवा

(ग) नियम २१ खालील अर्ज प्राप्त झालेला असून देखील त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये, नियम २२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नोटीस देण्यास असमर्थ ठरला असेल तर,

हक्क मागणीदार अर्जदार, नामनिर्देशित व्यक्ती, किंवा यथास्थिती, कायदेशीर वारस, अर्ज करण्यास कारण घडल्याच्या तारखेपासून एकशे ऐंशी दिवसांच्या आत, कलम ५६ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ग) अन्वये निदेश देण्यासाठी, विरुद्ध पक्षकार किंवा पक्षकार जितके असतील तितक्या जादा प्रतींसह, नमुना-चारमध्ये सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करेल:

परंतु, सक्षम प्राधिकाऱ्यास विनिर्दिष्ट कालावधी समाप्त झाल्यानंतर, अर्जदाराकडून दर्शवण्यात येणाऱ्या पुरेशा कारणावरून, या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज स्वीकारता येईल.

(२) पोट-नियम (१) खालील अर्ज व अशा अर्जाशी संबंधित असलेले अन्य दस्तऐवज, सक्षम प्राधिकाऱ्यास व्यक्तीश : सादर करण्यात येतील किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठविण्यात येतील.

२६. निदेशासाठी अर्जावर कार्यवाही करण्याची कार्यपद्धती.—(१) नियम २४ अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने किंवा व्यक्तिशः **नमुना-पाच** मधील नोटीस काढून, अर्जदारास तसेच नियोक्त्यास, विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस, वेळी व ठिकाणी, सर्व संबंधित दस्तऐवज आणि कोणत्याही असल्यास, साक्षीदारांसह, एकतर स्वतः किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहण्यासाठी पाचारण करेल.

(२) नियोक्त्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या, नामनिर्देशित व्यक्तीच्या, किंवा यथास्थिती, कायदेशीर वारसाच्या वतीने कार्य करण्यास इच्छुक असणारी कोणतीही व्यक्ती, ज्याच्या वतीने ती कार्य करण्याची मागणी करीत आहे त्या नियोक्त्याकडील, किंवा यथास्थिती, संबंधित व्यक्तीकडील प्राधिकारपत्र, त्याचबरोबर प्रकरणांमधील तिचा हितसंबंध स्पष्ट करणारे आणि असे कार्य करण्याच्या परवानगीसाठी विनंती करणारे लेखी निवेदन, सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करेल. सक्षम प्राधिकारी, एकतर त्यास मान्यता देणारा किंवा प्रार्थना केलेली परवानगी देण्यास नकार देण्याच्या बाबतीत, नकार देण्याची कारणे विनिर्दिष्ट करणारा आदेश,त्यावर नोंदवील.

(३) प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे उपस्थित राहणारा पक्षकार, प्रतिनिधीच्या कृतींना बांधील असेल.

(४) पोट-नियम (१)अन्वये निश्चित केलेल्या तारखेस सुनावणी पूर्ण झाल्यानंतर किंवा आवश्यक असेल त्याप्रमाणे असा आणखी पुरावा घेतल्यानंतर, दस्तऐवजांची किंवा साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर, सुनावणी व चौकशी केल्यानंतर, सक्षम प्राधिकारी, संहितेअन्वये अर्जदारास कोणतीही रक्कम प्रदेय आहे किंवा कसे यासंबंधी त्याचा निष्कर्ष नोंदवील. निष्कर्षाची एक प्रत, प्रत्येक पक्षकारास देण्यात येईल.

(५) जर संबंधित नियोक्ता, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय, यथोचितरित्या नोटीस बजावल्यानंतर, सुनावणीच्या विनिर्दिष्ट तारखेस उपस्थित राहण्यास निष्फळ ठरला तर, सक्षम प्राधिकारी, अर्जावर, एकतर्फी सुनावणी व निर्णय घेऊ शकेल. जर अर्जदार,कोणत्याही वाजवी कारणाशिवाय,सुनावणीच्या विनिर्दिष्ट तारखेस उपस्थित राहण्यास निष्फळ ठरला तर, सक्षम प्राधिकारी अर्ज रद्द करू शकेल :

परंतु, पोट-नियम (५) खालील आदेशाचे, आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कोणतेही योग्य कारण दर्शविल्यावर, पुनर्विलोकन करता येईल आणि अर्जाची पुन्हा सुनावणी घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेची विरोधी पक्षकारांना चौदा दिवसांपेक्षा कमी नसेल अशी नोटीस दिल्यानंतर, अर्जाची पुन्हा सुनावणी करता येईल.

२७. सुनावणीचे ठिकाण व वेळ.—सक्षम प्राधिकरणाची बैठक, त्याला योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी घेण्यात येईल.

२८. शपथ देणे.—सक्षम प्राधिकारी, प्रतिज्ञापत्र करण्याच्या प्रयोजनार्थ शपथ देण्यासाठी त्याच्या कार्यालयातील लिपिकास प्राधिकृत करू शकेल.

२९. साक्षीदारांना समन्स काढणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे.—प्राधिकारी, त्याच्या समोरील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर, त्याच्या समोरील कार्यवाहीमध्ये सहभागी असलेल्या पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर किंवा त्याशिवाय, आणि सक्षम प्राधिकाऱ्यास न्याय असल्याचे दिसून येतील अशा अटींवर, साक्ष देण्यासाठी किंवा दस्तऐवज सादर करण्यासाठी अथवा या दोन्ही प्रयोजनांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस, वेळी व ठिकाणी उपस्थित राहण्याकरिता **नमुना- पाच** मध्ये कोणत्याही व्यक्तीस समन्स काढू शकेल.

३०. समन्स किंवा नोटीस बजावणे.—(१) पोट-नियम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेली कोणतीही नोटीस, समन्स, आदेशिका, किंवा आदेश, एकतर व्यक्तिशः किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, अथवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याअन्वये विहित केलेल्या अन्य कोणत्याही रीतीने बजावता येईल.

(२) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्यासमोरील कोणत्याही कार्यवाहीतील पक्षकार म्हणून असंख्य व्यक्ती असतील आणि अशा व्यक्ती कोणत्याही औद्योगिक संघटनेच्या किंवा संघाच्या सदस्य असतील किंवा एखाद्या प्राधिकृत व्यक्तीद्वारे प्रतिनिधित्व करीत असतील तेव्हा, औद्योगिक संघटनेच्या किंवा संघाच्या सचिवावर किंवा जेव्हा तेथे असा सचिव नसेल तेव्हा, त्याच्या प्रमुख अधिकाऱ्यावर, अथवा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीवर बजावलेली नोटीस ही, अशा व्यक्तींवर बजावल्याचे मानण्यात येईल.

३१. सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे प्रकरणांचा अभिलेख ठेवणे.—(१) सक्षम प्राधिकारी, कलम ५६ अन्वये प्रत्येक प्रकरणाचा तपशील नोंदवील आणि आदेश संमत करतेवेळी, अशाप्रकारे नोंदवलेल्या तपशिलावर सही करेल आणि तारीख नोंदवील.

(२) सक्षम प्राधिकारी, प्रत्येक प्रकरणी आदेश संमत करते वेळी, प्रकरणाच्या गुणवत्तेवरून निष्कर्ष देखील नोंदवील आणि आदेशाच्या पत्रकाबरोबर साक्षी पुराव्यांचे ज्ञापन एकत्रितपणे दाखल करेल.

(३) कोणताही आदेश किंवा निदेश या व्यतिरिक्त, या नियमांन्वये ज्यावर सक्षम प्राधिकाऱ्याने स्वाक्षरी करण्याची आवश्यकता आहे अशा कोणत्याही अभिलेखावर, सक्षम प्राधिकाऱ्याने या प्रयोजनासाठी लेखी स्वरूपात नियुक्त केलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याकडून, सक्षम प्राधिकाऱ्याच्या वतीने व त्याच्या निदेशान्वये, स्वाक्षरी करण्यात येईल.

३२. उपदानाचे प्रदान करण्याचा निदेश.—अर्जदार संहितेअन्वये उपदानाचे प्रदान करण्यास हक्कदार आहे असा निष्कर्ष, नियम २५ च्या पोट-नियम (४) अन्वये नोंदविलेला असेल तर, सक्षम प्राधिकारी, प्रदेय असलेली रक्कम विनिर्दिष्ट करणारी आणि नियोक्त्याला नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, सक्षम प्राधिकरणाच्या सुचनेनुसार, अर्जदारास त्याचे प्रदान करण्याचा निदेश देणारी, **नमुना-सहा**मधील नोटीस, संबंधित नियोक्त्याला इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा नोंदणीकृत पोच देय डाकेने किंवा व्यक्तिशः देईल. नोटीसीची एक प्रत, अर्जदार कर्मचाऱ्यास, नामनिर्देशित व्यक्तीस, किंवा यथास्थिती, त्याच्या कायदेशीर वारसास पृष्ठांकित करण्यात येईल.

३३. अपील.— (१) संहितेच्या कलम ५६ च्या-पोट कलम (८) खालील अपिलाचे ज्ञापन, त्याच्या प्रतींसह, एकतर व्यक्तिशः सुपूर्द करून किंवा पोच देय नोंदणीकृत डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, विरोधी पक्षकार व सक्षम प्राधिकरण यांच्यासह अपिलीय प्राधिकाऱ्यास सादर करण्यात येईल.

(२) अपिलाच्या ज्ञापनामध्ये प्रकरणाचे तथ्य, सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय, अपिलाची कारणे आणि मागितलेला दिलासा यांचा अंतर्भाव असेल.

(३) अपिलाच्या ज्ञापनास, सक्षम प्राधिकाऱ्याच्या निष्कर्षाची व उपदानाचे प्रदान करण्याच्या निदेशाची प्रमाणित प्रत जोडण्यात येईल.

(४) अपिलाच्या ज्ञापनाची प्रत मिळाल्यावर, सक्षम प्राधिकारी, अपील प्राधिकाऱ्याकडे प्रकरणाचा अभिलेख पाठवील.

(५) अपिलाच्या ज्ञापनाची प्रत मिळाल्याच्या दिवसापासून चौदा दिवसांच्या आत, विरोधी पक्षकार, कोणत्याही असल्यास, अतिरिक्त युक्तिवादासह ज्ञापनाच्या प्रत्येक परिच्छेदाचे भाष्य, अपीलकारस त्याची प्रत सादर करण्यासह अपील प्राधिकाऱ्यास सादर करेल.

(६) अपिलीय प्राधिकारी, अपिलातील पक्षकारांना बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याचा निर्णय नोंदवील. निर्णयाची प्रत, अपिलातील पक्षकारांना, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा नोंदणीकृत डाकेने किंवा व्यक्तिशः देण्यात येईल आणि त्याची प्रत, प्रकरणाचा त्याचा अभिलेख परत करण्यासह सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

(७) सक्षम प्राधिकारी, अपील प्राधिकाऱ्याचा निर्णय प्राप्त झाल्यावर, त्याने ठेवलेल्या प्रकरणाच्या अभिलेखामध्ये आवश्यक नोंद करेल.

(८) अपील प्राधिकाऱ्याचा निर्णय प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकरण, त्या निर्णयान्वये जर आवश्यक असेल तर, उपदान प्रदान करण्याच्या त्याच्या निदेशामध्ये फेरबदल करेल आणि प्रदेय असलेली फेरबदल केलेली रक्कम विनिर्दिष्ट करणारी आणि नियोक्त्याला नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याच्या सुचनेनुसार, अर्जदारास त्याचे

प्रदान करण्याचा निदेश देणारी, **नमुना-सहा**मधील नोटीस, संबंधित नियोक्त्याला देईल.नोटीसीची एक प्रत, अपील करणाऱ्या कर्मचाऱ्यास, नामनिर्देशित व्यक्तीस, किंवा यथास्थिती, त्याच्या कायदेशीर वारसास आणि अपील प्राधिकाऱ्यास पृष्ठांकित करण्यात येईल.

३४. उपदानाच्या वसुलीकरिता अर्ज.- जेव्हा एखादा नियोक्ता, नियम ३१, किंवा यथास्थिती, नियम ३२ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या नोटीसीनुसार, संहितेअन्वये देय असलेल्या उपदानाचे प्रदान करण्यात कसूर करेल तेव्हा, ज्यास उपदानाची रक्कम प्रदेय असेल असा संबंधित कर्मचारी, त्याची नामनिर्देशित व्यक्ती, किंवा यथास्थिती, त्याचा कायदेशीर वारस, संहितेच्या कलम १२९ अन्वये त्याची वसुली करण्यासाठी **नमुना-सात**मध्ये दोन प्रतीत, सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करू शकेल.

३५. कलम ५८ च्या पोटकलम (१) अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याची अर्हता व अनुभव.- प्रकरण-पाचच्या प्रयोजनार्थ, कलम ५८ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल आणि असा सक्षम प्राधिकारी, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी पुढील अर्हता व अनुभव धारण करेल आणि पुढील क्षेत्रासाठी असेल;

राज्य शासनास, जी व्यक्ती ५ वर्षांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीसाठी राज्य न्यायिक सेवेची सदस्य आहे अशा व्यक्तीची अधिसूचनेद्वारे नियुक्ती करता येईल.

प्रकरण - पाच

प्रसुती लाभ

३६. कलम ७२ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रसुती लाभाची तक्रार.—(१) कलम ७२ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रसुती लाभाची तक्रार, **नमुना-आठ**मध्ये लेखी स्वरूपात निरीक्षक- तथा-सुविधाकाराकडे करण्यात येईल.

(२) जेव्हा कलम ७२ मध्ये निर्दिष्ट केलेली तक्रार निरीक्षक-तथा-सुविधाकारास प्राप्त होईल तेव्हा, तो, याबाबतीत नियोक्त्याने ठेवलेल्या संबंधित अभिलेखाची तपासणी करेल, आस्थापनेमध्ये काम करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींची तपासणी करेल आणि चौकशीच्या प्रयोजनार्थ आवश्यक जबाब नोंदवून घेईल आणि जर प्रसुती लाभ किंवा रक्कम अनुचितपणे रोखून धरण्यात आलेली आहे अशी त्याची खात्री पटली तर, तो, महिलेस, किंवा यथास्थिती, कलम ६३ अन्वये प्रदानाची हक्क मागणी करणाऱ्या व्यक्तीस तात्काळ किंवा विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये, रक्कम प्रदान करण्याकरिता नियोक्त्याला निदेश देईल.

३७. कलम ७२ च्या पोट-कलम (१) खालील अपील.—(१) कलम ७२ च्या पोट-कलम (२) खालील निरीक्षक-तथा-सुविधाकाराच्या निर्णयाविरुद्ध सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करण्यात येईल.

(२) व्यथित व्यक्ती, सक्षम प्राधिकाऱ्याकडे **नमुना- नऊ**मध्ये लेखी स्वरूपात अपील दाखल करेल आणि त्याच्या पुष्ट्यर्थ अन्य दस्तऐवज दाखल करेल.

(३) जेव्हा अपील मिळेल तेव्हा, सक्षम प्राधिकारी, निश्चित केलेल्या तारखेपूर्वी निरीक्षक-तथा सुविधाकाराकडून प्रकरणाचा अभिलेख मागवील. सक्षम प्राधिकारी, आवश्यक असेल तर, व्यथित व्यक्तीचे आणि निरीक्षक-तथा-सुविधाकाराचे जबाब देखील नोंदवील आणि आवश्यक असेल असे, कोणतेही असल्यास, स्पष्टीकरण मागवील.

(४) त्याच्यासमोर सादर केलेले दस्तऐवज, पुरावा आणि त्याला सादर केलेली किंवा त्याने खात्री केलेली वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतर, सक्षम प्राधिकारी त्याचा निर्णय देईल.

प्रकरण - सहा

इमारत व इतर बांधकाम कामाच्या बाबतीतील उपकर

३८. कलम १०१ खालील उपकराच्या रकमेचे प्रदान करण्याची कालमर्यादा.—उपकराचे प्रदान करण्याची तारीख ही, ज्या तारखेस उपकर वसुली अधिकाऱ्याकडे रक्कम जमा केलेली आहे ती तारीख किंवा मूळ स्त्रोतातून वजावट केल्याची तारीख अथवा ज्या तारखेस स्थानिक प्राधिकरणाकडे रक्कम जमा करण्यात आलेली आहे ती तारीख असेल.

३९. कलम १०५ च्या पोट-कलम (२) खालील अपिलाचे शुल्क.- पोट-कलम (१) खालील प्रत्येक अपिलासोबत, अशा अपिलाखालील विवादातील रकमेच्या किंवा शास्तीच्या, किंवा यथास्थिती, दोन्हींच्या एक टक्का इतके, परंतु पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतके ना-परतावायोग्य शुल्क प्रदान करण्यात येईल.

प्रकरण - सात

वित्त व लेखे

४०. कलम १२१ खालील वसुली करण्यायोग्य नसलेल्या देय रकमा निर्लेखित करण्याच्या शर्ती व रीत.- जेव्हा सामाजिक सुरक्षा मंडळाचे असे मत असेल की, सामाजिक सुरक्षा मंडळास देय असलेल्या अंशदानाच्या, उपकराच्या, व्याजाच्या व नुकसानीच्या रकमा वसुलीयोग्य राहिलेल्या नाहीत तेव्हा, सामाजिक सुरक्षा मंडळ किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी, पुढील शर्तींच्या अधीन राहून, उक्त रकमा, निर्लेखित करण्यास मंजुरी देऊ शकेल:-

(क) आस्थापना पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी बंद करण्यात आलेली आहे आणि शक्य ते सर्व प्रयत्न करून देखील नियोक्त्याचा ठावठिकाणा लागू शकलेला नाही;

(ख) महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळाने मिळवलेल्या हुकूमनाम्याची, कसूरदार नियोक्त्याच्या अपर्याप्त मत्तेच्या अभावी यशस्वीपणे अंमलबजावणी करता येऊ शकलेली नाही; किंवा

(ग) उपदानाची हक्क मागणी,---

(एक) कारखाना किंवा आस्थापना दिवाळखोरीत गेल्यामुळे शासकीय अवसायकाकडून; किंवा

(दोन) युनिट राष्ट्रीयीकरण करण्यात आल्याने किंवा शासनाकडून ते ताब्यात घेण्यात आल्याने प्रदान आयुक्तांकडून,

पूर्णपणे भागविलेली नाही.

प्रकरण - आठ

प्राधिकारी, निर्धारण,अनुपालन व वसुली

४१. कलम १२३ अन्वये अभिलेख व नोंदवह्या ठेवण्याचा नमुना व रीत.—(१) महिला कर्मचाऱ्यांची नोंदवही.- (क) (एक) ज्यामध्ये महिला कर्मचारी काम करीत आहेत अशा प्रत्येक आस्थापनेचा नियोक्ता, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा हार्ड प्रतीच्या स्वरूपात **नमुना-दहा**मध्ये महिला कर्मचाऱ्यांची नोंदवही तयार करेल व ठेवील आणि त्यामध्ये आस्थापनेमधील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा तपशील नोंदवील.

(दोन) सदर नोंदवही, अधिसूचित निरीक्षण योजनेअंतर्गत निरीक्षक-तथा-सुविधाकार यांच्याकडून निरीक्षण करण्यासाठी नेहमी उपलब्ध करून देण्यात येईल.

(तीन) नियोक्ता, महिला कर्मचाऱ्यांच्या नोंदवहीमध्ये संहितेच्या अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असेल असा अन्य तपशील नोंदवू शकेल.

(२) अभिलेख.—संहितेच्या प्रकरण-पाचच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम याअन्वये ठेवलेला अभिलेख, तो, तयार केल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल.

(३) वार्षिक विवरणे.—(क) ज्यास संहितेच्या प्रकरण-पाचच्या तरतुदी लागू आहेत असा नियोक्ता, प्रत्येक वर्षातील फेब्रुवारीच्या १ तारखेस किंवा त्यापूर्वी, संबंधित वर्षाच्या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या तपशिलासंबंधीची माहिती देणारे, **नमुना-अकरा**मधील एकीकृत स्वरूपात एकत्रित केलेले वार्षिक विवरणपत्र, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करेल:

परंतु, निरीक्षण करताना, निरीक्षक-तथा-सुविधाकार, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा अन्य स्वरूपात ठेवलेले लेखे, पुस्तके, नोंदवह्या व अन्य दस्तऐवज सादर करण्यास फर्मावू शकेल.

स्पष्टीकरण.—या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, "इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील" या संज्ञेस, माहिती तंत्रज्ञान अधिनियम,२००० (२००० चा २१) यांच्या कलम २ च्या खंड (र) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

(ख) ज्यास संहितेच्या तरतुदी लागू आहेत असा नियोक्ता, जर आस्थापनेच्या कामाची विक्री करीत असेल, त्याचा परित्याग करीत असेल किंवा ते खंडित करीत असेल तर, तो, अशी विक्री किंवा परित्याग केल्याच्या तारखेपासून एक महिन्यांच्या आत अथवा यथास्थिती, खंडित केल्याच्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत, मागील वर्षाचा शेवट आणि अशा प्रकारे विक्री, परित्याग किंवा खंडित केल्याची तारीख यामधील कालावधीच्या बाबतीत, खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेले **नमुना- अकरा**मध्ये आणखी एक एकीकृत विवरण, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करेल.

प्रकरण - नऊ

अपराध व शास्ती

४२.कलम १३८ च्या पोट-कलम (४) अन्वये अपराधांची प्रशमन करण्याची रीत.- (१) कलम १३८ च्या पोट-कलम (१) अन्वये अपराधांची प्रशमन करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी, कलम १३८ अन्वये जे अपराध प्रशमन करण्यायोग्य आहेत अशा अपराधांसाठी **नमुना-बारा**मध्ये आपसमेळ करण्याची नोटीस इलेक्ट्रॉनिक स्वरूपात काढील.

(२) अशा प्रकारे नोटीस दिलेली व्यक्ती, **नमुना-बारा**च्या भाग-तीनमध्ये अर्ज करू शकेल आणि संपूर्ण प्रशमनची रक्कम, नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, इलेक्ट्रॉनिक हस्तांतरणाद्वारे किंवा अन्यथा जमा करेल.

(३) प्रशमन अधिकारी, प्रशमनच्या नोटीसीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने, ज्याच्याकडून अशी रक्कम प्राप्त झालेली आहे अशा व्यक्तीस, प्रशमनची रक्कम जमा केल्याच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत, **नमुना-बारा**च्या भाग-चारममधील प्रशमन प्रमाणपत्र देईल.

(४) जर अशा प्रकारे अधिसूचित केलेली व्यक्ती, विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रशमनची रक्कम जमा करण्यास कसूर करेल तर, सक्षम न्यायालयासमोर खटला दाखल करण्यात येईल किंवा ज्याच्या बाबतीत प्रशमनची नोटीस काढली होती तो अपराध, अशा व्यक्तीविरुद्ध दाखल करण्यात येईल.

(५) खटला दाखल केल्यानंतर प्रशमन.—(क) न्यायालयास, संहितेच्या कलम १३८ खालील तक्रार दाखल केल्यानंतर, कोणत्याही वेळी कोणत्याही प्रशमन करण्यायोग्य अपराधाचे प्रशमन करता येईल.

(ख) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ३२० च्या तरतुदी, अशा प्रशमनासाठी लागू असतील.

प्रकरण - दहा

संकीर्ण

४३.कलम १४१ च्या पोट-कलम (५) अन्वये सामाजिक सुरक्षा निधीची स्थापना व प्रशासन.- (१) मिळालेले पुढील सर्व निधी, स्वतंत्र लेख्यामध्ये जमा करण्यात येतील आणि त्यास महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा निधी म्हणून संबोधण्यात येईल आणि कलम १०९ अन्वये अधिसूचित केलेल्या योजनांचा सर्व खर्च या निधीतून भागवण्यात येईल :—

(क) संहितेच्या कलम १४१ च्या पोट-कलम (५) खालील निधी ;

(ख) संहितेच्या कलम १४१ च्या पोट-कलम (५) च्या खंड (दोन) च्या तरतुदींनुसार, राज्य शासनाद्वारे ठरविण्यात येईल अशा रीतीने, राज्य शासन, निम-शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा स्थानिक संस्था, इत्यादींना मनुष्यबळ पुरवण्यासाठी नामिकेवरील कंत्राटदारांकडून मिळालेले उपदान;

(ग) संहितेच्या कलम १४१ च्या पोट-कलम (५) च्या खंड (दोन) च्या तरतुदींनुसार, राज्य शासनाद्वारे ठरविण्यात येईल अशा रीतीने, मालमत्ता करावर आकारलेल्या उपकराच्या स्वरूपात, महानगरपालिकांमधील किंवा नगर परिषदांमधील किंवा नगरपंचायतींमधील निवासी किंवा वाणिज्यिक मालमत्तांच्या मालकांकडून मिळालेले उपदान;

(घ) नियोक्त्याकडील अंशदान, राज्य शासन, निम-शासन व खाजगी संघटना यांच्याकडून मिळालेल्या देणग्या;

(ङ) सामाजिक उत्तरदायित्व या अंतर्गत मिळालेल्या देणग्या;

(च) विविध निधी निर्माणकारी योजनांमार्फत मिळालेले उत्पन्न;

(छ) केंद्र व राज्य शासनाकडून मिळालेली अनुदाने;

(ज) नोंदणी शुल्क, नूतनीकरण शुल्क, सदस्यत्व शुल्क, इत्यादींसह असंघटित कामगारांनी दिलेले सर्व अंशदान;

(झ) प्रतिभूती व ठेवी, भाडे आणि अन्य कोणत्याही रीतीने किंवा अन्य कोणत्याही स्रोतांमधून मंडळाकडून मिळालेल्या सर्व रकमा यांवरील गुंतवणूकीवर मिळालेले व्याज;

(ञ) राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल असे अन्य कोणतेही स्रोत;

(ट) राज्य शासनाकडून आकारला जाणारा कर, उपकर किंवा शुल्क या मार्गाने निर्माण केलेले उत्पन्न.

(२) सामाजिक सुरक्षा मंडळ, त्याच्या निधीची गुंतवणूक करू शकेल आणि अशा गुंतवणुका वसूल करू शकेल.

(३) राज्य शासन, प्रारंभिक निधीचे स्रोत शोधील किंवा वेळोवेळी महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा निधीमध्ये त्याची पुनःपूर्ती करेल.

(४) निधी, राज्य शासनाद्वारे अधिसूचित केलेल्या रीतीने, विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्या कार्यालयामार्फत राज्य शासनाकडून संकलित करण्यात येईल, प्रशासन करण्यात येईल व खर्च करण्यात येईल.

(५) राज्य शासनाच्या, कोणत्याही असल्यास, निदेशांचे, विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्या कार्यालयाकडून अनुपालन करण्यात येईल.

(६) महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा निधीच्या लेख्याचे विवरणपत्र, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात (नमुन्यांमध्ये) व रीतीने विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्या कार्यालयाकडून ठेवण्यात येईल आणि वेळेवेळी राज्य शासनाला सादर करण्यात येईल.

(७) महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा निधीच्या लेखांची, भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षा करण्यात येईल.

****

नमुना- एक

[नियम २१ (१), (३) व (४) पहा]

नामनिर्देशन/नवीन नामनिर्देशन/नामनिर्देशनाचा फेरबदल.

(लागू नसलेले शब्द खोडा)

प्रति,

(येथे संपूर्ण पत्त्यासह आस्थापनेचे नाव किंवा वर्णन द्या)

मी,श्री/श्रीमती/कुमारी..... (संपूर्ण नाव), ज्याचा/ जिचे तपशील खालील विवरणपत्रामध्ये देण्यात आलेले आहे ती व्यक्ती असून, याद्वारे, माझा मृत्यू झाल्यानंतर प्रदेय असलेली अंशदानाची रक्कम तसेच माझ्या खात्यात जमा असणारी उपदानाची रक्कम प्रदेय झाली असेल त्यापूर्वी किंवा जेव्हा उपदानाची रक्कम प्रदेय झाली असेल तेव्हा, ती प्रदान करण्यात येण्यापूर्वी, माझा मृत्यू झाल्यास, माझ्या खात्यात जमा असलेली उपदानाची रक्कम मिळण्यासाठी खाली नमूद केलेल्या व्यक्तीस (व्यक्तींना) नामनिर्देशित करीत आहे/ सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम २ च्या खंड (३३) च्या अर्थानुसार, खाली नमूद केलेल्या रीतीने..... (येथे तारीख लिहा) पासून माझे कुटुंब संपादित केले आहे आणि म्हणून खाली नमूद केलेल्या व्यक्तीस (व्यक्तींना) नव्याने नामनिर्देशित करीत आहे आणि उक्त उपदानाची रक्कम, नामनिर्देशितीच्या (निर्देशितींच्या) नावासमोर (नावांसमोर) नमूद केलेल्या प्रमाणात प्रदान करण्यात येईल असा निदेश देत आहे.

किंवा

मी, श्री/श्रीमती/कुमारी.....(संपूर्ण नाव), ज्याचा/ जिचा तपशील खालील विवरणपत्रामध्ये देण्यात आलेले आहे ती व्यक्ती, याद्वारे, अशी नोटीस देते की, दिनांक..... रोजी मी दाखल केलेले आणि तुमचा संदर्भ क्रमांक....., दिनांक..... याअन्वये नोंद केलेले नामनिर्देशनपत्र, पुढील रीतीने फेरबदल करण्यात येईल. *(*अनावश्यक भाग काढून टाका)*

२. मी, याद्वारे असे प्रमाणित करतो/करते की, नामनिर्देशित केलेली व्यक्ती (व्यक्ती), सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम २ च्या खंड (३३) च्या अर्थानुसार, माझ्या कुटुंबातील सदस्य (सदस्य) आहे/ आहेत.

३. मी, याद्वारे असे घोषित करतो की, उक्त संहितेच्या कलम २ च्या खंड (३३) च्या अर्थानुसार, मला कोणतेही कुटुंब नाही.

४. (क) माझे वडील/ आई/ मातापिता माझ्यावर अवलंबून नाही/नाहीत.

(ब) माझ्या पतीचे वडील/ आई/ मातापिता माझ्या पतीवर अवलंबून नाही/नाहीत.

५. उक्त संहितेच्या कलम २ च्या खंड (३३) च्या व्याख्येमधील प्राधिकाऱ्याकडे दिलेल्या दिनांक.....च्या नोटीशीद्वारे मी, माझ्या कुटुंबातून माझ्या पतीला वगळलेले आहे.

६. यात केलेले नामनिर्देशन, माझ्या पूर्वीच्या नामनिर्देशनास अविधिग्राह्य करते.

नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती (व्यक्ती)

अ. क्र.	संपूर्ण पत्त्यासह नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे (व्यक्तींचे) पूर्ण नाव	कर्मचाऱ्याशी असलेले नाते	नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे वय	ज्या प्रमाणात उपदान विभागण्यात येईल ते प्रमाण
१				
२				
३				

"कुटुंब" संपादित करण्याची रीत

(कुटुंब कोणत्या रीतीने संपादित केले होते त्या संबंधीचा तपशील येथे द्यावा, म्हणजेच विवाहाद्वारे किंवा अवलंबून असलेले माता-पिता अथवा दत्तग्रहणासारख्या अन्य प्रक्रियेमार्फत किंवा कसे)

विवरणपत्र

१) कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव:

२) लिंग:

३) धर्म:

४) अविवाहित/ विवाहित/विधवा/ विधुर आहे किंवा कसे:

५) जेथे नोकरी करीत असेल तो विभाग/शाखा/ कक्ष:

६) तिकीट क्रमांकासह किंवा अनुक्रमांकासह, कोणताही असल्यास, धारण केलेले पद:

७) नियुक्तीची तारीख:

८) कायमचा पत्ता:

गाव:....., ठाणे : .....

उपजिल्हा :.....,पोस्ट:.....

जिल्हा:.....राज्य:.....

पिन कोड :....., ईमेल आयडी /भ्रमणध्वनी क्रमांक :.....

ठिकाण :.....

दिनांक :.....

कर्मचाऱ्याची सही/ अंगठा.

नियोक्त्याचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केलेल्या तपशिलाची पडताळणी करण्यात आली आहे आणि त्याची या आस्थापनेमध्ये नोंद केलेली आहे.

नियोक्त्याचा संदर्भ क्रमांक, कोणताही असल्यास :

दिनांक :.....

नियोक्त्याची/ प्राधिकृत अधिकाऱ्याचे पदनाम

आस्थापनेचे नाव व पत्ता

किंवा तिचा रबरी शिक्का.

नियोक्त्याची पोच पावती

मी दाखल केलेल्या व नियोक्त्याने यथोचितपणे प्रमाणित केलेल्या **नमुना-एक** मधील नामनिर्देशनाची दुसरी प्रत मिळाली.

दिनांक :.....

कर्मचाऱ्याची सही.

नमुना- दोन

[नियम २२(१), (२), (३)पहा]

कर्मचाऱ्याद्वारे/ नामनिर्देशित व्यक्तीद्वारे/ कायदेशीर वारसाद्वारे उपदानाचा अर्ज

(लागू नसलेले शब्द खोडा)

प्रति,

.....

.....

.....

(येथे संपूर्ण पत्त्यासह आस्थापनेचे नाव किंवा वर्णन द्या)

महोदय/ महोदया,

मी,.....(कर्मचाऱ्याचे /

नामनिर्देशित व्यक्तीचे / कायदेशीर वारसाचे नाव) /मयत.....(कर्मचाऱ्याचे नाव) ची नामनिर्देशित व्यक्ती/ मयत.....(कर्मचाऱ्याचे नाव) ची कायदेशीर वारस, पुढील कारणामुळे सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ५३ याच्या पोट-कलम (१) अन्वये, मी हक्कदार असलेल्या उपदानाचे प्रदान करण्याची विनंती करीत आहे:-

(क) माझा नियत सेवावधी/सेवानिवृत्ती/सलग पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सेवा पूर्ण झाल्यानंतर राजीनामा/ अपघातामुळे आलेली संपूर्ण विकलांगता/ रोगामुळे झालेली संपूर्ण विकलांगता/ दिनांक.....पासून अंमलात आलेल्या निश्चित मुदती रोजगाराखालील कराराचा कालावधी समाप्त झाल्यावर, किंवा;

(ख) सेवेची..... वर्षे पूर्ण झाल्यानंतर,सेवेत असताना/ नियत सेवावधी झाल्यावर, उपरोक्त कर्मचाऱ्याचा ..... रोजी झालेला मृत्यू/सेवेत असताना अपघातामुळे किंवा रोगामुळे उपरोक्त कर्मचाऱ्याची, दिनांक.....पासून घडून आलेली संपूर्ण विकलांगता, किंवा;

(ग) सेवेची..... वर्षे पूर्ण झाल्यानंतर/कोणतेही नामनिर्देशन न करता, सेवेत असताना/ नियत सेवावधी झाल्यावर,.....रोजी (दिनांक) तुमच्या आस्थापनेतील उपरोक्त कर्मचाऱ्याचा झालेला मृत्यू/ सेवेत असताना अपघातामुळे किंवा रोगामुळे उपरोक्त कर्मचाऱ्याची, दिनांक.....पासून घडून आलेली संपूर्ण विकलांगता.

माझा नियुक्तीसंबंधीचा आवश्यक तपशील खालील विवरणपत्रामध्ये दिलेला आहे :—

१. कर्मचाऱ्याचे संपूर्ण नाव (जर उपदानाची हक्क मागणी कर्मचाऱ्याने केलेली असेल तर) :

क. कर्मचाऱ्याची वैवाहिक स्थिती (विवाहित/ अविवाहित/ विधवा/ विधुर):

ख. कर्मचाऱ्याचा पूर्ण पत्ता :

२. नामनिर्देशित व्यक्तीचे/ कायदेशीर वारसाचे नाव (जर उपदानाची हक्क मागणी नामनिर्देशित व्यक्तीने/ कायदेशीर वारसाने केलेली असेल तर):

क. कर्मचाऱ्याचे नाव:

ख. नामनिर्देशित व्यक्तीची/ कायदेशीर वारसाची वैवाहिक स्थिती (विवाहित/ अविवाहित/ विधवा/ विधुर):

ग. नामनिर्देशित व्यक्तीचे/ कायदेशीर वारसाचे कर्मचाऱ्याशी असलेले नाते:

घ. नामनिर्देशित व्यक्तीचा/ कायदेशीर वारसाचा पूर्ण पत्ता:

ङ. कर्मचाऱ्याच्या मृत्यूची तारीख व मृत्यूचा पुरावा:

च. अभिलिखित केलेल्या नामनिर्देशनाचा संदर्भ क्रमांक, उपलब्ध असल्यास:

३. कर्मचारी शेवटी जेथे काम करीत होता तो विभाग/ शाखा/ कक्ष:

४. कर्मचाऱ्याने धारण केलेले पद:

५. नियुक्तीची तारीख:

६. सेवा समाप्तीची तारीख व कारण:

७. मृत्यूची तारीख:

८. कर्मचाऱ्याच्या सेवेचा एकूण कालावधी:

९. कर्मचाऱ्याला आहरित केलेले शेवटचे एकूण वेतन:

१०. कर्मचाऱ्यास प्रदेय असलेले एकूण उपदान/नामनिर्देशित व्यक्तीने/ कायदेशीर वारसाने हक्क मागणी केलेला उपदानाचा हिस्सा:

११. कृपया प्रदान, डिमांड ड्राफ्टद्वारे करण्यात यावे/ माझ्या बँक खाते क्रमांक..... मध्ये जमा करण्यात यावे.

आपला विश्वासू,

अर्जदार कर्मचाऱ्याची/नामनिर्देशित

व्यक्तीची/कायदेशीर वारसाची

सही किंवा अंगठा.

ठिकाण:.....

दिनांक:.....

****

नमुना - तीन

[नियम २३(१)(क),(ख) व (५) पहा]

उपदानाच्या प्रदानाची/ हक्क मागणी नाकारण्याची नोटीस

(लागू नसलेले शब्द खोडा)

प्रति,

.....

.....

.....

(अर्जदार कर्मचा-याचे/नामनिर्देशित व्यक्तीचे/

कायदेशीर वारसाचे नाव किंवा पत्ता :

याद्वारे आपल्याला असे कळविण्यात येते की,—

(क) *महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२१ याच्या पोट-नियम (१) च्या खंड (ख) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, उक्त नियमाखालील **नमुना-दोन** मधील तुमच्या अर्जावर नमूद केल्याप्रमाणे, उपदानाचे प्रदान करण्याचा तुमचा दावा खाली नमूद केलेल्या कारणांसाठी अनुज्ञेय नाही :-

कारणे (येथे कारणे विनिर्दिष्ट करा) ; किंवा

(ख) *महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२१च्या नियम २२ चे पोट-नियम (१) च्या खंड (क) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, रुपये.....(रुपये..... ....शब्दात) इतकी रक्कम उपदान म्हणून तुम्हाला/ ..... रोजी..... यांनी केलेल्या आणि.....यामध्ये नोंदवलेल्या नामनिर्देशाच्या अटीनुसार, या आस्थापनेचा कर्मचारी.....याचा कायदेशीर वारस म्हणून, उपदानाचा तुमचा हिस्सा म्हणून प्रदेय आहे.

२. *तुमच्या उपदानाचे डिमांड ड्राफ्टचे प्रदान स्विकारण्यासाठी ..... रोजी (दिनांक)..... वाजता (वेळ)..... येथे (येथे ठिकाण विनिर्दिष्ट करा)उपस्थित राहावे.

३. प्रदेय असलेली रक्कम, तुम्हाला डिमांड ड्राफ्टमार्फत पाठवण्यात येईल किंवा तुम्ही वर्णन केल्याप्रमाणे, तुमच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

४. परिगणनेचे संक्षिप्त विवरणपत्र:

(क) नियुक्तीची तारीख:

(ख) सेवा समाप्तीची/नियतसेवा अवधीची/ राजीनाम्याची/ विकलांगतेची/ मृत्यूची तारीख:

(ग) संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवेचा एकूण कालावधी :

..... वर्षे.....महिने

(घ) शेवटी आहरित केलेले वेतन:

(ङ) कायदेशीर वारस म्हणून नामनिर्देशनाच्या अटींनुसार प्रदेय असलेल्या अनुज्ञेय उपदानाचे प्रमाण:

(च) प्रदेय असलेली रक्कम :

**लागू नसल्यास, परिच्छेद खोडा.*

ठिकाण :

दिनांक :

नियोक्त्याची/ प्राधिकृत अधिकाऱ्याची सही.

आस्थापनेचे नाव किंवा वर्णन अथवा

तिचा रबरी शिक्का.

प्रत: उपदान नाकारल्याच्या बाबतीत सक्षम प्राधिकारी.

प्रत: महासंचालक, कामगार बुरो यांचे कार्यालय, श्रम व रोजगार मंत्रालय, चंदिगड.

****

नमुना- चार

[नियम २५(१) (ग) पहा]

निदेशासाठी अर्ज

सामाजिक सुरक्षा संहिता,२०२० याच्या प्रकरण- पाच अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यासमोर

अर्ज क्रमांक. दिनांक

.....

(अर्जदाराचे पूर्ण नाव पत्त्यासह)

आणि

.....

(संबंधित नियोक्त्याचे पूर्ण नाव पत्त्यासह)

यांच्यामध्ये

अर्जदार हा, वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी आहे/वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी, मयत..... याची नामनिर्देशित व्यक्ती आहे/वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी व मयत ..... याचा कायदेशीर वारस आहे, आणि त्याच्या स्वतःच्या/उपरोक्त कर्मचाऱ्याच्या दिनांक..... रोजीच्या नियत सेवा अवधीच्या/त्याच्या स्वतःच्या निवृत्तीच्या/सलग.....वर्षे इतकी सेवा पूर्ण झाल्यावर दिनांक.....रोजी दिलेल्या उपरोक्त कर्मचाऱ्याचा राजीनाम्याच्या/अपघातामुळे /रोगामुळे..... पासून घडून आलेल्या त्याच्या स्वतःच्या/उपरोक्त कर्मचाऱ्याच्या संपूर्ण विकलांगतेच्या/ दिनांक ..... रोजी झालेल्या उपरोक्त कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या कारणामुळे सामाजिक सुरक्षा संहिता,२०२० याच्या कलम ५३ अन्वये उपदानाचे प्रदान करण्यास हक्कदार आहे.

२. अर्जदाराने,महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा सहिता नियम, २०२१ च्या नियम ... अन्वये दिनांक..... रोजी अर्ज सादर केला आहे, परंतु, वर नमूद केलेल्या नियोक्त्याने, तो दाखल करून घेण्यास नकार दिला/ .....नियमाच्या पोट-नियम ..... च्या खंड ..... अन्वये दिनांक ..... रोजी उपदानाची रक्कम देऊ करणारी नोटीस काढली असून जी मला देय असलेल्या रकमेपेक्षा कमी आहे/.....नियमाच्या पोट-नियम..... च्या खंड.....अन्वये दिनांक ..... रोजी उपदानाचे प्रदान करण्याची माझी पात्रता नाकारणारी नोटीस काढली आहे. उक्त नोटीसीची दुसरी प्रत यासोबत जोडलेली आहे.

३.अर्जदार असे सादर करतो की, या प्रकरणी विवाद आहे (विवाद विनिर्दिष्ट करा).

४. अर्जदार यासोबतच्या जोडपत्रामध्ये आवश्यक तपशील सादर करीत आहे आणि अशी विनंती करीत आहे की, अर्जदारास प्रदेय असलेली उपदानाची रक्कम, कृपया सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित करावी आणि ती रक्कम, अर्जदारास प्रदान करण्यासाठी वर नमूद केलेल्या नियोक्त्यास निदेश द्यावेत.

५. अर्जदार असे घोषित करीत आहे की, या यासोबतच्या जोडपत्रमध्ये सादर केलेला तपशील, माझ्या संपूर्ण माहिती व विश्वासाप्रमाणे, सत्य व अचूक आहे.

दिनांक :

अर्जदाराची सही/ अंगठा.

जोडपत्र

१. अर्जदाराचे नाव व संपूर्ण पत्ता:

२. हक्क मागणीचा आधार (कर्मचाऱ्याचा मृत्यू/ नियत सेवा अवधी/ सेवानिवृत्ती/ राजीनामा/ विकलांगता/ निश्चित मुदती रोजगाराखालील कराराचा कालावधी पूर्ण होणे):

३. कर्मचाऱ्याचे नाव व पूर्ण पत्ता :

४. कर्मचाऱ्याची वैवाहिक स्थिती (विवाहित/अविवाहित/ विधवा/ विधुर) :

५. नियोक्त्याचे नाव व पूर्ण पत्ता:

६. कर्मचारी शेवटी जेथे काम करीत होता तो विभाग/ शाखा/ कक्ष(माहित असल्यास):

७. कर्मचाऱ्याने धारण केलेले पद तसेच तिकोट किंवा अनुक्रमांक, कोणताही असल्यास (माहित असल्यास):

८. कर्मचाऱ्याची नियुक्तीची तारीख (माहित असल्यास):

९. कर्मचाऱ्याची सेवा समाप्तीची तारीख व कारण (कर्मचाऱ्याचा मृत्यू/ नियत सेवाअवधी/ सेवानिवृत्ती/ राजीनामा/ विकलांगता/ निश्चित मुदती रोजगाराखालील कराराचा कालावधी पूर्ण होणे):

१०. कर्मचाऱ्याच्या सेवेचा एकूण कालावधी:

११. कर्मचाऱ्याला आहरित केलेले शेवटचे एकूण वेतन:

१२. जर कर्मचारी मयत असेल तर, मृत्यूची तारीख व त्याचे कारण:

१३. कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या पुष्ट्यर्थ पुरावा/ साक्षीदार:

१४. नामनिर्देशित व्यक्ती असेल तर, नियोक्त्याकडे नामनिर्देशन दाखल केल्याचा क्रमांक व दिनांक:

१५. कायदेशीर वारस असेल तर, कायदेशीर वारस असल्याच्या पुष्ट्यर्थ पुरावा/साक्षीदार:

१६. कर्मचाऱ्यास प्रदेय असलेले एकूण उपदान (माहित असल्यास):

१७. नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारस म्हणून अर्जदारास प्रदेय असलेल्या उपदानाची टक्केवारी:

१८. अर्जदाराने हक्क मागणी केलेल्या उपदानाची रक्कम :

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही/ अंगठा.

नमुना- पाच

[नियम २६(१) व २९ पहा]

सक्षम प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्यासाठी नोटीस/समन्स

(लागू नसलेले शब्द खोडा)

प्रति,

.....

.....

(नियोक्त्याचे/ अर्जदाराचे नाव व पत्ता)

ज्याअर्थी, तुमच्या अंतर्गत असलेल्या श्री..... या कर्मचाऱ्याने / वर नमूद केलेल्या नियोक्त्याच्या अंतर्गत असलेल्या श्री..... या कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने(व्यक्तींनी)/ कायदेशीर वारसाने (वारसांनी), महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम,२०२१ याच्या नियम २४ च्या पोट-नियम (१) अन्वये अर्ज दाखल केला असून त्यात असे अभिकथन केले आहे की,.....

(उक्त अर्जाची प्रत सोबत जोडलेली आहे, जर समन्स काढलेले असेल तर, अर्जाची प्रत आवश्यक असणार नाही)

त्याअर्थी, आता, अर्जाशी संबंधित असणाऱ्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर उत्तरे देण्याच्या प्रयोजनार्थ/अभिकथनांच्या पुष्ट्यर्थ/त्यास उत्तरे देण्यासाठी एकतर व्यक्तिशः किंवा याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत दिनांक .....२०.....रोजी सकाळी /दुपारी.....वाजता.....येथे (ठिकाणी) सक्षम प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्यासाठी याद्वारे तुम्हाला पाचारण करण्यात येत आहे/समन्स बजावण्यात येत आहे; आणि तुम्ही उपस्थित राहण्यासाठी निश्चित केलेला दिवस, अर्ज अंतिम स्वरूपात निकालात काढण्यासाठी नियत केलेला असल्याने, तुमच्या अभिकथनाच्या/ बचावाच्या पुष्ट्यर्थ, ज्याच्या साक्षीवर अवलंबून राहण्याचा तुमचा इरादा आहे ते सर्व साक्षीदार आणि ज्याच्यावर अवलंबून राहण्याचा तुमचा इरादा आहे ते दस्तावेज त्या दिवशी सादर करण्यासाठी तुम्ही उपस्थित राहिले पाहिजे.

यात यावर नमूद केलेल्या दिवशी तुम्ही उपस्थित राहण्यात कसूर केली तर, अर्ज रद्द करण्यात येईल/तुमच्या अनुपस्थितीत, त्यावर एकतर्फीपणे सुनावणी घेण्यात येईल व निर्णय करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ज्याअर्थी,..... द्वारे ..... पासून उपदानाच्या हक्क मागणीतून उद्भवणाऱ्या आणि सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ५६ अन्वये अर्जदाराने या प्राधिकाऱ्याकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांमध्ये ..... यांच्या वतीने, खालील यादीमध्ये नमूद केलेले पुरावे देण्यासाठी तुमची उपस्थिती आवश्यक आहे/तुम्ही दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे, त्याअर्थी, दिनांक .....२०.....रोजी सकाळी/दुपारी.....वाजता.....येथे (ठिकाणी) या प्राधिकाऱ्यासमोर व्यक्तिशः उपस्थित राहण्यासाठी आणि या प्राधिकाऱ्यास पाठविण्याकरिता तुमच्या सोबत उक्त दस्तऐवज आणण्यासाठी, याद्वारे तुम्हाला समन्स बजावण्यात येत आहे.

दस्तऐवजांची यादी :

१.

२.

३.

आज दिनांक.....२०..... रोजी, माझ्या सही व शिक्क्यानीशी दिली.

सक्षम प्राधिकारी

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये

टीप.— १. लागू नसलेले शब्द व परिच्छेद खोडा.

२. लागू नसलेला भाग वगळावा.

३. समन्स दोन प्रतींमध्ये काढण्यात येईल. दुसरी प्रत, समन्स बजावलेल्या व्यक्तीने, निश्चित केलेल्या तारखेपूर्वी स्वाक्षरी करून परत पाठवायची आहे.

४. जर पुरावे देण्यासाठी नव्हे तर केवळ दस्तऐवज सादर करण्यासाठी समन्स काढलेले असेल तर अशा बाबतीत, या प्रयोजनार्थ निश्चित केलेल्या दिवशी व वेळी सक्षम प्राधिका-यासमोर दस्तऐवज सादर करण्याची व्यवस्था केली असेल तर, समन्सचे पालन करण्यासाठी हे पुरेसे असेल.

****

नमुना-सहा

[नियम ३२ व ३३(८) पहा]

सक्षम प्राधिकाऱ्याने /अपील प्राधिकाऱ्याने घोषित केल्याप्रमाणे उपदानाचे प्रदान करण्याच्या आदेशाची नोटीस

(लागू नसलेले शब्द खोडा)

प्रति,

.....

(नियोक्त्याचे नाव व पत्ता)

१. ज्याअर्थी, तुमच्या अंतर्गत असलेल्या श्री/श्रीमती/ कुमारी.....या कर्मचाऱ्याने / तुमच्या अंतर्गत असलेल्या मयत.....या कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने(व्यक्तींनी)/ कायदेशीर वारसाने (वारसांनी), सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ५६ अन्वये माझ्यासमोर अर्ज दाखल केला आहे; किंवा

ज्याअर्थी, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये उपदान म्हणून रुपये..... इतक्या रकमेचे श्री/श्रीमती/कुमारी..... यांना प्रदान करण्यास फर्मावणारी नोटीस दिनांक..... रोजी तुम्हाला देण्यात आली होती.

२. आणि ज्याअर्थी, तुमच्या समक्ष, दिनांक..... रोजी अर्जाची सुनावणी केली होती आणि सुनावणीनंतर, अशा निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, उक्त श्री/श्रीमती/कुमारी..... हे/या, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये उपदान म्हणून रुपये ..... इतक्या रकमेचे प्रदान करण्यासाठी हक्कदार आहे; किंवा

ज्याअर्थी, तुम्ही/अर्जदाराने, अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील केले होते,अपील प्राधिकाऱ्याने असा निर्णय दिला आहे की, श्री/श्रीमती/कुमारी..... यांना, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये उपदान म्हणून रुपये..... इतक्या रकमेचे प्रदान करावयाचे आहे.

त्याअर्थी, आता, मी याद्वारे, तुम्हाला असा निदेश देतो की, ही नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत,श्री/श्रीमती/कुमारी ..... यांना, रुपये..... इतक्या रकमेचे प्रदान करावे व त्याची माहिती मला द्यावी.

आज दिनांक.....२०..... रोजी, माझ्या सही व शिक्क्यानीशी दिली.

सक्षम प्राधिकारी.

सामाजिक सुरक्षा संहिता,२०२० अन्वये

प्रत :

१. अर्जदार- त्यास असा सल्ला देण्यात येतो की, प्रदान स्वीकारण्यासाठी नियोक्त्याशी संपर्क साधावा.

२. अपिलीय प्राधिकारी, लागू असल्यास.

****

नमुना- सात

(नियम ३४ पहा)

उपदानाच्या वसुलीसाठी अर्ज

सामाजिक सुरक्षा संहिता,२०२० याच्या प्रकरण- पाच अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यासमोर

अर्ज क्रमांक. दिनांक :

.....

(अर्जदाराचे पूर्ण नाव पत्त्यासह)

आणि

.....

(संबंधित नियोक्त्याचे/विश्वस्त संस्थेचे/विमादाराचे पूर्ण नाव पत्त्यासह)

यांच्यामध्ये

१.अर्जदार हा, वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी आहे/वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी, मयत..... याची नामनिर्देशित व्यक्ती आहे/वर नमूद केलेल्या नियोक्त्याचा कर्मचारी, मयत ..... याचा कायदेशीर वारस आहे, आणि सामाजिक सुरक्षा संहिता,२०२० याअन्वये उपदान म्हणून रुपये..... इतक्या रकमेचे प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२१ याच्या नियम ३१ किंवा नियम ३२ अन्वये दिनांक.....रोजी तुम्हाला दिलेल्या नोटीसीमध्ये, उक्त नियोक्त्यास निदेश देण्याची विनंती केली होती.

२. अर्जदार असे सादर करीत आहे की, तुम्ही निदेश दिल्याप्रमाणे, उपदानाचे प्रदान करण्यासाठी मी त्याच्याकडे जाऊन देखील उपदानाची उक्त रक्कम प्रदान करण्यात उक्त नियोक्ता असमर्थ ठरलेला आहे.

३. म्हणून, अर्जदार अशी विनंती करीत आहे की, तुमच्या निदेशाच्या अटीनुसार, उपदान म्हणून मला येणे असलेल्या रुपये..... इतक्या रकमेची वसुली करण्यासाठी संहितेच्या कलम १२९ अन्वये प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

अर्जदाराची सही/ अंगठा.

ठिकाण :

दिनांक :

टीप : लागू नसलेले शब्द खोडा.

****

नमुना- आठ

(नियम ३६ (१) पहा)

निरीक्षक-तथा- सुविधाकाराकडे तक्रार

प्रति,

निरीक्षक-तथा-सुविधाकार,

(सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये)

महोदय/ महोदया,

मी,.....(महिलेचे नाव)..... या आस्थापनेमध्ये (आस्थापने नाव व पूर्ण पत्ता) नोकरी केलेली महिला, किंवा मी,.....(नाव) ..... या आस्थापनेमध्ये (आस्थापने नाव व पूर्ण पत्ता) नोकरी केलेल्या .....(महिलेचे नाव) यांनी, कलम ६२ अन्वये नामनिर्देशित केलेली व्यक्ती किंवा यांचो कायदेशीर प्रतिनिधी, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० यामध्ये व त्याखालील नियमांमध्ये निर्धारित केलेल्या शर्तींची पूर्तता करीत असून मी, कलम ६५ अन्वये प्रसुती लाभाची रुपये.....इतकी रक्कम आणि/ किंवा वैद्यकीय बोनसची रुपये .....इतकी रक्कम आणि/ किंवा देय असलेल्या रजा वेतनाची रुपये..... इतकी रक्कम मिळण्यास हक्कदार आहे, परंतु, नियोक्त्याने, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या प्रकरण-सहाच्या तरतुदींनुसार तिच्या कामावरील उपस्थितीच्या कालावधीत किंवा कारणासाठी ती रक्कम, अनुचितपणे रोखून धरलेली आहे/तिला कार्यमुक्त केले आहे/ बडतर्फ केले आहे.

म्हणून, तुम्हाला अशी विनंती करतो/करते की, उक्त रक्कम मला प्रदान करण्यासाठी नियोक्त्याला निदेश द्यावे/ नियोक्त्याने केलेली कार्यमुक्तता किंवा बडतर्फी रद्द करण्यात यावी.

महिलेची/ नामनिर्देशित व्यक्तीची/

कायदेशीर प्रतिनिधीची सही किंवा अंगठा.

दिनांक :

जर महिला/ नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर प्रतिनिधी

सही करण्यास असमर्थ असेल तर अशा बाबतीत

साक्षांकनकाराची सही आणि अंगठा.

महिलेचा/ नामनिर्देशित व्यक्तीचा/ कायदेशीर

प्रतिनिधीचा पूर्ण पत्ता.

****

नमुना-नऊ

अपील

(नियम ३७ (२) पहा)

प्रति,

प्राधिकारी,
(सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये)
..... (पत्ता)

महोदय/ महोदया,

मी,..... (महिलेचे नाव) खाली सही करणार, ... या आस्थापनेची(आस्थापने नाव व पूर्ण पत्ता) महिला कर्मचारी,

*कलम ७२ च्या पोट-कलम (२) अन्वये निरीक्षक-तथा-सुविधाकार यांनी दिलेल्या आदेशाने व्यथित झाले असून या सोबत जोडलेल्या कारणांसाठी कलम ६८ च्या पोट-कलम (२) अन्वये हे अपील करीत आहे आणि अशी विनंती करीत आहे की, वर नमूद केलेली रक्कम मला प्रदान करण्याचा उक्त नियोक्त्यास आदेश द्यावा. याबाबतीतील निरीक्षक-तथा-सुविधाकार यांनी दिलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे; किंवा

*श्री.....निरीक्षक-तथा-सुविधाकार यांनी, कलम ७२ च्या पोट-कलम (२) अन्वये, प्रसुती लाभाची रक्कम किंवा ज्यास महिला (महिलेचे नाव) हक्कदार असल्याचे म्हटलेले आहे अशी अन्य रक्कम ..... (रकमेचे स्वरूप) प्रदान करण्याचा/सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या प्रकरण-पाचच्या तरतुदींनुसार कामावरील उपस्थितीच्या कालावधीत किंवा कारणासाठी केलेली माझी कार्यमुक्ती/ बडतर्फी रद्द करण्याचा निदेश दिला आहे. *(अनावश्यक भाग खोडा).*

कलम ७२ च्या पोट-कलम (३) अन्वये मी हे अपील केले आहे. यासोबत जोडलेल्या ज्ञापनामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती आणि यासोबत दाखल केलेले अन्य दस्तऐवज विचारात घेता, असे सादर करण्यात येत आहे की, महिला प्रसुती लाभासाठी किंवा उक्त रकमेसाठी महिला हक्कदार नाही आणि म्हणून, निरीक्षक तथा-सुविधाकाराचा आदेश, ज्याची प्रत जोडलेली आहे, रद्द करण्यात यावा.

**अनावश्यक भाग खोडा.*

महिलेची/ व्यथित व्यक्तीची

सही किंवा अंगठा.

दिनांक :

.....

जर महिला सही करण्यास असमर्थ असेल
तर अशा बाबतीत साक्षांकनकाराची
सही आणि अंगठा.

नामनिर्देशित व्यक्तीचा/ कायदेशीर
प्रतिनिधीचा पूर्ण पत्ता

नमुना-दहा

[नियम ४१ (१) (क) (एक) पहा]

महिला कर्मचाऱ्यांची नोंदवही

आस्थापनेचे नाव :

१. अनुक्रमांक :

२. महिलेचे नाव व तिच्या वडिलांचे (किंवा विवाहित असल्यास, पतीचे) नाव:

३. नियुक्तीचा दिनांक:

४. कामाचे स्वरूप:

५. ज्यामध्ये तिने नोकरी केली आहे, अपरिहार्य कामबंदीवर होती व नोकरी केली नव्हती तो महिना व वर्ष यासह दिनांक:

महिना	काम केलेल्या दिवसांची संख्या	अपरिहार्य कामबंदीवर असलेल्या दिवसांची संख्या	काम न केलेल्या दिवसांची संख्या	शेरा
अ	ब	क	ड	इ

६. ज्या तारखेस महिलेने कलम ६२ अन्वये नोटीस दिली ती तारीख:

७. कोणताही असल्यास, कार्यमुक्त केल्याचा/बडतर्फ केल्याचा दिनांक:

८. कलम ६२ अन्वये गरोदर असल्याचा पुरावा सादर केल्याचा दिनांक:

९. बाळाची जन्म तारीख:

१०. गरोदर असल्याचा/ गर्भपात झाल्याचा/ वैद्यकीय गर्भसमापन केल्याचा/ संततीनियमन शस्त्रक्रिया (ट्युबेकटॉमी ऑपरेशन) केल्याचा/बाळाच्या मृत्यूचा/ बाळ दत्तक घेतल्याचा पुरावा सादर केल्याचा दिनांक:

११. कलम ६५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या आजारपणाचा पुरावा सादर केल्याचा दिनांक:

१२. अपेक्षित प्रसूतीसाठी आगाऊपणे प्रदान केलेल्या प्रसुती लाभाची रक्कम व दिनांक:

१३. प्रसुती लाभाच्या परिणामस्वरूप प्रदानाची तारीख व रक्कम:

१४. कलम ६४ अन्वये, प्रदान केली असल्यास, बोनसची रक्कम व दिनांक:

१५. कलम ६५(१) व ६५(३) अन्वये रजेच्या कारणावरून प्रदान केलेल्या रजा वेतनाची रक्कम व दिनांक:

१६. कलम ६५(२) अन्वये रजेच्या कारणावरून प्रदान केलेल्या रजा वेतनाची रक्कम व दिनांक आणि मंजूर केलेल्या रजेचा कालावधी:

१७. कलम ६२ अन्वये महिलेने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे नाव:

१८. जर महिला मयत झाली असेल तर, तिच्या मृत्यूचा दिनांक, ज्या व्यक्तीला प्रसुती लाभ आणि/ किंवा अन्य रक्कम प्रदान करावयाची होती त्या व्यक्तीचे नाव, त्याची रक्कम आणि प्रदान केल्याचा दिनांक:

१९. जर महिला मयत झाली असेल, परंतु बाळ जिवंत असेल तर, बाळाच्या वतीने, ज्या व्यक्तीला प्रसुती लाभाची रक्कम प्रदान करावयाची होती त्या व्यक्तीचे नाव आणि ज्या कालावधीसाठी रक्कम प्रदान करायची होती तो कालावधी:

२०. महिला कर्मचा-यांच्या नोंदवहीमधील नोंदी अधिप्रमाणित करणा-या आस्थापनेच्या कर्मचा-याची सही.

२१. निरीक्षक-तथा-सुविधाकाराच्या वापरासाठी शे-याचा स्तंभ.

****

नमुना-अकरा

[नियम ४१ (३) (क) पहा]

एकीकृत वार्षिक विवरण

अ. सर्वसाधारण भाग :

(क) आस्थापनेचे नाव:.....

आस्थापनेचा पत्ता:.....

घर क्रमांक/ सदनिका क्रमांक:.....,मार्ग क्रमांक/ भूखंड क्रमांक:..... ,

गाव:....., जिल्हा:.....,

राज्य:....., पिन कोड क्रमांक.....

(ख) नियोक्त्याचे नाव:.....

नियोक्त्याचा पत्ता:.....

घर क्रमांक/ सदनिका क्रमांक:.....,मार्ग क्रमांक/ भूखंड क्रमांक:..... ,

गाव:....., जिल्हा:.....,

राज्य:....., पिन कोड क्रमांक.....

ईमेल आयडी:....., दूरध्वनी क्रमांक:.....

भ्रमणध्वनी क्रमांक:.....

(ग) व्यवस्थापकाचे किंवा आस्थापनेचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव : .....,

पत्ता:.....

घर क्रमांक/ सदनिका क्रमांक:.....,मार्ग क्रमांक/ भूखंड क्रमांक:..... ,

गाव:....., जिल्हा:.....,

राज्य:....., पिन कोड क्रमांक.....

ईमेल आयडी:....., दूरध्वनी क्रमांक:.....

भ्रमणध्वनी क्रमांक:.....

ब. खालील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेला संहितेखालील नियोक्त्याचा नोंदणी/ परवाना क्रमांक :

अ.क्र.	नाव	नोंदणी	असल्यास (नोंदणी क्रमांक)
(१)	(२)	(३)	(४)
०१.	व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता,२०२०		
०२.	सामाजिक सुरक्षा संहिता,२०२०		
०३.	त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा		

क. नियोक्त्याचा,कंत्राटदाराचा व कंत्राटी कामगाराचा तपशील:

०१.	कंत्राटदाराच्या आस्थापनेच्या बाबतीत, नियोक्त्याचे नाव	
०२	आस्थापनेच्या प्रारंभाचा दिनांक	
०३	वर्षभरात आस्थापनामध्ये काम केलेल्या कंत्राटदारांची संख्या	
०४	ज्या वर्षी कंत्राटी कामगार कामावर होते त्या वर्षामधील दिवसांची एकूण संख्या	
०५	वर्षभरात कंत्राटी कामगारांनी काम केलेल्या श्रम दिवसांची एकूण संख्या	
०६	व्यवस्थापकाचे किंवा अभिकर्त्याचे नाव (खाणींच्या बाबतीत)	
०७	पत्ता:..... घर क्रमांक/ सदनिका क्रमांक:....., मार्ग क्रमांक/ भूखंड क्रमांक..... गाव:....., जिल्हा:....., राज्य:....., पिन कोड क्रमांक.....	

	ईमेल आयडी:....., दूरध्वनी क्रमांक:..... भ्रमणध्वनी क्रमांक:.....	

ड. कामाचे तास व साप्ताहिक सुट्टीचा दिवस:

०१	वर्षभरात काम केलेल्या दिवसांची संख्या	
०२	वर्षभरात काम केलेल्या श्रम दिवसांची संख्या	
०३	कामाचे दैनंदिन तास	
०४	सुट्टीचा साप्ताहिक दिवस	

इ. वर्षामधील कोणत्याही दिवशी काम केलेल्या व्यक्तींची कमाल संख्या:

अ. क्र.	पुरुष	स्त्रिया	किशोर-वयातील (१४ ते १८ वर्षे वय या दरम्यान)	बालके (१४ वर्षे वया खालील)	एकूण

फ. वेतन दर (प्रवर्ग निहाय):

प्रवर्ग	वेतन दर	कामगारांची संख्या							
		नियमित				कंत्राटी			
		पुरुष	स्त्रिया	बालक	किशोरवयीन	पुरुष	स्त्रिया	बालके	किशोरवयीन
अतिकुशल									
कुशल									
अर्ध-कुशल									
अकुशल									

ग. (क) प्रदानाचा तपशील:

प्रदान केलेले स्थूल वेतन		वजावटी			प्रदान केलेले निव्वळ वेतन	
रोख स्वरूपात	वस्तूच्या स्वरूपात	दंड	नुकसानीसाठी किंवा हानीसाठी केलेल्या वजावटी	इतर	रोख स्वरूपात	वस्तूच्या स्वरूपात

(ख) वर्षभरामध्ये वेतनासह ज्यांना रजा मंजूर केली होते अशा कर्मचाऱ्यांची संख्या:

अ.क्र.	वर्षभरामध्ये	कामगारांची संख्या	वेतनासह मंजूर केलेली रजा

ह. वैधानिक योजनांतर्गत पुरविलेल्या विविध कल्याणकारी सुखसुविधांचा तपशील:

अ. क्र.	पुरविलेल्या विविध कल्याणकारी सुखसुविधांचे स्वरूप	वैधानिक (स्वरूप विनिर्दिष्ट करा)

ज. सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० या खालील प्रसुती लाभ :

(क) आस्थापना, वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचारी वर्गाचा तपशील:

०१	आस्थापना उघडल्याचा दिनांक	
०२	बंद केल्याचा दिनांक, बंद केलेली असल्यास	
०३	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव	
०३(एक)	वैद्यकीय अधिकाऱ्याची अहर्ता	
०३(दोन)	येथे वैद्यकीय अधिकारी आहे का (खाणी किंवा सर्कशी)?	
०३(तीन)	जर अंशिक कालावधीसाठी असेल तर,तर तो/ ती आस्थापनेमध्ये किती वेळा भेट देतो/ देते?	
०३(चार)	येथे कोणतेही रुग्णालय आहे का?	
०३(पाच)	असल्यास, किती खाटा पुरवलेल्या आहेत?	
०३(सहा)	येथे महिला डॉक्टर आहे का?	
०३(सात)	असल्यास, तिची अहर्ता काय आहे?	
०३(आठ)	येथे अहर्ताप्राप्त प्रसविका आहेत का?	
०३(नऊ)	शिशुगृहाची तरतूद करण्यात आलेली आहे का?	

(ल) सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० खालील मंजूर केलेल्या रजा :

०१	आस्थापनेतील महिला कर्मचाऱ्यांची एकूण संख्या	
०२	मंजूर केलेल्या रजेच्या दिवसांची एकूण संख्या	
०३	इएसआयने प्रसुती रजा / प्रसुती लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या	

घोषणापत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती सत्य व अचूक आहे आणि मी असे देखील प्रमाणित करतो/ करते की, माझ्या आस्थापनेस लागू असलेल्या कामगार कायद्यांच्या सर्व तरतुदींचे पालन केलेले आहे.

ठिकाण:

दिनांक:

येथे स्वाक्षरी.

****

नमुना- बारा

(नियम ४२ (१) पहा)

ज्याने पहिल्यांदाच अपराध केलेला आहे अशा नियोक्त्यास अपराधाची प्रशमन करण्यासाठी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम १३८ च्या पोट-कलम (१) अन्वये नोटीस

नोटीस क्रमांक..... **दिनांक :**

माझ्यासमोर सादर केलेला अभिलेख व दस्तऐवज याच्या आधारे, खाली सही करणार यास असा विश्वास ठेवण्यास कारण आहे की, तुम्ही,..... या आस्थापनेचा (नोंदणी क्रमांक.....) नियोक्ता असताना, खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे, संहितेच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या योजनांचे किंवा नियमांचे किंवा विनियमांचे उल्लंघन करण्याचा अपराध केला आहे:-

भाग - एक

१	व्यक्तीचे नाव	
२	आस्थापनेचे नाव व पत्ता	
३	आस्थापनेचा नोंदणी क्रमांक	
४	अपराधाचा तपशील	
५	ज्याखाली अपराध केलेला आहे त्या संहितेच्या/ योजनांच्या/ नियमांच्या/ विनियमांच्या तरतुदी	
६	अपराधाची प्रशमनाचे प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेली प्रशमनाची रक्कम	
७	स्तंभ ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम जमा करण्यासाठी नाव व खात्याचा तपशील	

भाग - दोन

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, ही नोटीस काढल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, वर नमूद केलेली रक्कम प्रदान करण्याचा आणि या नोटीसीच्या भाग-तीनमध्ये यथोचितपणे भरलेला अर्ज परत करण्याचा विकल्प तुम्हाला आहे.

जर विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये उक्त रक्कम प्रदान केली नाही तर, या संबंधात आणखी कोणतीही संधी न देता, खटला दाखल करण्याची आवश्यक कारवाई सुरू करण्यात येईल.

(प्रशमन करणाऱ्या अधिकाऱ्याची सही)

दिनांक :

ठिकाण :

भाग- तीन

(नियम ४१ (२) पहा)

अपराधाची प्रशमन करण्यासाठी कलम १३८ च्या पोट-कलम (४) खालील अर्ज

संदर्भ: नोटीस क्रमांक..... **दिनांक :**

खाली सही करणाऱ्याने, भाग-एकच्या स्तंभ ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण रक्कम जमा केली आहे आणि भाग-एकमध्ये नमूद केलेल्या अपराधांची प्रशमन करण्याच्या विनंतीसह प्रदानाचा तपशील खाली दिलेला आहे :—

१. जमा केलेल्या प्रशमन रकमेचा तपशील (इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तयार केलेल्या पावतीची प्रत जोडावयाची आहे):

२. वर नमूद केलेल्या अपराधांच्या उल्लंघनासाठी, जर भरला असेल तर, खटल्याचा तपशील देण्यात यावा.

३. सदर अपराध, पहिला अपराध आहे किंवा कसे अथवा अर्जदाराने या अपराधापूर्वी अन्य कोणताही अपराध केलेला आहे किंवा कसे, जर केलेला असेल तर, अपराधाचा संपूर्ण तपशील :

४. अर्जदार जी देऊ इच्छित असेल अशी अन्य कोणतीही माहिती :

अर्जदाराची सही.

(नाव व पदनाम)

दिनांक :

ठिकाण :

भाग-चार

(नियम ४१ (३) पहा)

प्रशमन प्रमाणपत्र

संदर्भ: नोटीस क्रमांक ..... **दिनांक :**

असे प्रमाणित करण्यात येते की, ज्या अपराधाच्या बाबतीत, नोटीस क्रमांक....., दिनांक..... ही नोटीस, श्री..... (अर्जदार), ... नियोक्ता (आस्थापनेचे नाव व नोंदणी क्रमांक) यांस पाठवलेली होती, त्या, संहितेच्या कलम १३३ च्या पोट-कलम.....खालील अपराधाचे, उक्त नोटीसीचे पालन करण्यासाठी अपराधांची प्रशमन करण्याकरिता, रुपये..... (रुपये.....शब्दात) इतक्या संपूर्ण रकमेचे वित्तप्रेषण केल्यामुळे प्रशमन करण्यात आले आहे.

(सही)

अधिकाऱ्याचे नाव व पदनाम.

दिनांक :

ठिकाण :

In Pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, No. S.S.C.-2021/C.R.28/LABOUR-9, dated 27th August 2021 published in the *Maharashtra Government Gazette*, Part I-L, Extra Ordinary is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
Joint Secretary to Government.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 27th August 2021.

NOTIFICATION

CODE ON SOCIAL SECURITY, 2020.

No. S.S.C-2021/C.R.28/LABOUR-9.—The following draft of rules which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by section 154 and section 156 of the Code on Social Security, 2020 (36 of 2020) read with section 24 of the General Clauses Act, 1897 (10 of 1897) and of all other powers enabling it in that behalf and in supersession of the Maharashtra Maternity Benefit Rules, 1965 made under the Maternity Benefit Act, 1961 (53 of 1961), the Payment of Gratuity (Maharashtra) Rules, 1972 made under the Payment of Gratuity Act, 1972 (39 of 1972) and the Maharashtra Unorganised Workers' Social Security Rules, 2013 made under the Unorganised Workers' Social Security Act, 2008 (33 of 2008), is hereby published as required by sub-section *(1)* of section 154 and sub-section *(1)* of section 156, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra, after the expiry of forty-five days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any objection or suggestion, which may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, Kamgar Bhavan, 'E' Block, Bandra-Kurla Complex, Bandra East, Mumbai-400051 or on email mahalabourcommr@ gmail.com from any person with respect to the said draft before the expiry of the above mentioned period, will be considered by the Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
Joint Secretary to Government.

DRAFT RULES

CHAPTER I

PRELIMINARY

1. *Short title.*—These rules may be called the Maharashtra Code on Social Security Rules, 2021.

2. *Definitions.*- *(1)* In these rules, unless the subject or context otherwise requires,—

(a) "appellate authority" means the Government of Maharashtra or the authority specified by the Government of Maharashtra under sub-section (8) of section 56 or an officer, senior in rank to the Assessing Officer for the purposes of section 105 of the Code, appointed by the State Government, as the case may be;

(b)"authority" means the Government of Maharashtra or the authority specified by the Government of Maharashtra under sub-section (*3*) of section 72, for making appeal against the order of the Inspector-cum-Facilitator;

(c)"chairperson" means the Chairperson of the Social Security Board or, as the case may be, the Chairperson of the Welfare Board;

(d) "Code" means the Code on Social Security, 2020 (36 of 2020);

(e) "electronically" means any information submitted by email or uploading on the designated portal or digital payment in any mode for the purpose of Code;

(*f*) "member" means member of the Board;

(*g*) "fund" means the Social Security Fund;

(*h*) "Form" means a form appended to these rules;

(*i*) "nomination" means nomination made under section 55 of the code;

(*j*)"register of women employees" means a register of women employees maintained under rule 41 ;

(*k*) "section" means a section of the Code;

(*l*) "Social Security Board" means the Maharashtra Unorganised Workers' Social Security Board constituted under sub-section (9) of section 6 of the Code;

(*m*) "specified" means specified by an order of the Government of Maharashtra or any officer so authorised by the Government of Maharashtra;

